# प्रकरण तिसरे

## 'वारुळ' कादंबरीतील व्यक्तिरेखा

१) प्रस्तावना
२) 'वारुळ' मधील व्यक्तिरेखा
  २.१) मुख्य व्यक्तिरेखा
    १) प्रभू
      • प्रभूचे बालपण
      • प्रभूचे तरुणपण
    २) गणा
    ३) कुलकर्णी मास्तर
    ४) येसाजी
    ५) भगवान पाटील
    ६) भिका
    ७) यादव
    ८) डॉ. अण्णासाहेब भोपळे
    ९) तायडे मास्तर
    १०) सूर्यकांत साठे
  २.२) गौण व्यक्तिरेखा
    १) पारु
    २) बायजा
    ३) राजाराम मास्तर
    ४) संतोष
    ५) ज्योती
    ६) सिदाजी पाटील
    ७) शिदनाक
    ८) राजू खंदारे
    ९) भोसले मास्तर
    १०) रामा बेले, लिंबा बेले

• समारोप
• निष्कर्ष
• संदर्भ ग्रंथ

# प्रकरण तिसरे
# 'वारुळ' कादंबरीतील व्यक्तिरेखा

## १) प्रस्तावना :—

'वारुळ' कादंबरी ही एक सामाजिक कादंबरी आहे. दुसऱ्या प्रकरणात बाबाराव मुसळे यांच्या या कादंबरीतील प्रेरणा व आशय सुत्राचा अभ्यास केला. आता आपण या कादंबरीतील व्यक्तिरेखाचा अभ्यास करणार आहोत.

कादंबरीच्या इतर घटकांपैकी कादंबरीतील व्यक्तिरेखा हा एक महत्त्वाचा घटक आहे. व्यक्तिरेखेमुळेच कादंबरीतील घटना घडतात. कादंबरीच्या कथानकाला व्यक्तिरेखेमुळे पुर्णत्व प्राप्त होते. साहित्य मनुष्य जीवनांचे चित्रण घडविते अशा साहित्यात व्यक्तिरेखांना अनन्यसाधारण महत्त्व दिसते. व्यक्तिरेखेबद्दल जान्हवी संत लिहीतात, "मानवी स्वभावाचे विविध नमुने कादंबरीत स्वीकारले जातात. हयासच व्यक्तिचित्रण किंवा चरित्र—चित्रण असे म्हणतात. हे व्यक्तिचित्रण जितके स्वाभाविक असेल तितकी ती कादंबरी वाचयला आवडेल."[१] घटनांच्या वेधक गुंफणीला आपण कथानक ज्या घटनांनी बनते. त्या घटना सिध्द होण्यासाठी अर्थातच व्यक्तिची, त्यांच्या स्वभावविशेषांची आवश्यकता असते. त्यामुळे व्यक्तिचित्रण व कथारचना ही कादंबरीची आवश्यक अंगे आहेत, परंतु त्या दोघांमध्ये व्यक्तिचित्रण हे अधिक महत्त्वाचे आहे.

'वारुळ' या सामाजिक कादंबरीत विदर्भातील वासिम—अकोला—अनसिंग या शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील असणाऱ्या अस्पृश्य समाजाच्या जातीचे चित्रण येते. या कादंबरीत तीन पिढयांचा संघर्ष येतो. येसाजीची पहिली पिढी आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सर्व महाराष्ट्रातील महारांनी दीक्षा घेतली ते बौध्द झाले. बौध्दांनी सोडलेली गावकीची कामे याच पहिल्या पिढीने राजीखुशीनेच स्वीकारली. प्रभूची पिढी दुसरी पिढी आहे. मातंग समाजाचा विकास परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यमातून करण्याचा ध्यास या पिढीला आहे. त्यासाठी अनेक अडचणींना तोंड दयावे लागते. अडी—अडचणींवर मात करीत डॉ.

अण्णासाहेब भोपळे यांनी मुंबई प्रदेशला सुरु केलेल्या 'आखिल महाराष्ट्र मातंग संघ' च्या माध्यमातून आपल्या समाजाचा विकास, परिवर्तन करण्याचा प्रयत्न ही पिढी करते. आपल्याच मातंग समाजातील लोकांचा समाजातील लोकांचा चळवळीला त्रास होतो. यात राजकारण हे मुख्यकरुन गावपातळीवरचे येते. तालुका, जिल्हा पातळीवरचेही राजकारणाचे पडसाद या वडगावच्या ग्रामपातळीवरच्या राजकारणावर पडलेले दिसून येतात. त्यातून प्रा. आंभोरे, तायडे गुरुजी, सूर्यकांत साठे, डॉ. भोपळे, इ. चे संदर्भ 'वारुळ' मध्ये येतात.

## २) 'वारुळ' मधील व्यक्तिरेखा :—

'वारुळ' चे कथानक वास्तवादी आहे. मातंग समाजाचे समाजवास्तव जाणून घेण्यासाठी 'वारुळ' मधील व्यक्तिरेखा अत्यंत जिवंत करण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. कादंबरीत मुख्य व्यक्तिरेखेबरोबर दुय्यम व्यक्तिरेखांच्या सहाय्याने 'वारुळ' कादंबरीच्या निवेदनाला, प्रसंगवर्णनाला एक वेगळे परिमाण मिळाले आहे. व्यक्तिरेखाटन लेखकाने कादंबरीत वेधक केले आहे. व्यक्तिच्या स्वभाव वैशिष्टयानुसार कादंबरीत व्यक्तिरेखा उभ्या केलेल्या आहेत.

### २.१) मुख्य व्यक्तिरेखा :—

कथा, कादंबरी नाटक हे कथनात्मक साहित्यप्रकार आहेत यामध्ये आपले अनुभव विश्व कथन करण्यासाठी कलाकृतीची निर्मिती करीत असताना, लेखक कथानकाप्रमाणे पात्रांची निर्मिती करतो व कथानकाच्या गतिमानतेसाठी कांही पात्रावर विशेष फोकस टाकतो त्याला मुख्य व्यक्तिरेखा म्हणतात. वारुळ मधील मुख्य व्यक्तिरेखा पुढीलप्रमाणे:—

१) **प्रभू** :— 'वारुळ' कादंबरीचा प्रभू हा नायक एक शांत स्वभावाचा दुसऱ्याचे हित कशात आहे हे पाहणारा या कादंबरीच्या सुरुवातीलाच प्रभूची व्यक्तिरेखा येते. "१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला." (वारुळ पृ. ७) अशी कादंबरीची सुरुवात होते त्या

ओळीवर प्रभूचे लक्ष जाते कारण अभ्यास करीत असताना गुरुजी सांगतात की प्रभूचा जन्मही १९४७ सालीच झाला. या कादंबरीचा नायक नंतर मोठेपणी गावपातळीवरील राजकारणात सहभागी होतो. स्वत:च्या जातीच्या मागण्या मान्य करुन घेऊन आपल्या हिताचे गट प्रभू व त्यांचे साथीदार निवडून आणतात. विरोधी पार्टीचे लिंबा बेले, या कादंबरीचा खलनायक गणा व त्याचा लहानभाऊ गजू यांना बेदम मारतो. प्रभू त्यांना घेऊन दवाखान्यात अनसिंगला घेऊन जातो. अशा प्रभूच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास पुढील मुद्दयांच्या आधारे करता येईल.

- **प्रभूचे बालपण** :— कादंबरीच्या सुरुवातीलाच या नायकाची व्यक्तिरेखा येते. अभ्यास करीत असताना कुलकर्णी मास्तर प्रभूला यांच्या वर्गाला शिकवित आहेत. मास्तरांनी त्याला प्रश्न विचारलेला असतो की भारताला स्वातंत्र्य मिळून किती वर्षे झाली? त्याचे लक्ष बरोबर उत्तर वहित नोंदवून घेतो प्रभू हा वर्गातला हुशार विद्यार्थी होता. कुलकर्णी मास्तर त्याला दररोज वेगवेगळे प्रश्न विचारायचे तोही त्याची उत्तरे दयायचा असाच वरील प्रश्न गुरुजी त्याला विचारतात त्याच्याकडून उत्तर मिळाले की प्रभू तुझा जन्मही १९४७ सालचाच आहे. अशी जाणीव प्रभूला करुन देतात. प्रभू आपल्या जन्माविषयी आईला विचारतो परंतु तिला साल निश्चित सांगता येत नाही. प्रभूच्या शाळेत सर्व जाती—धर्माची मुले शिकतात हे अशिक्षित असणाऱ्या प्रभूच्या आईस नवीन वाटते प्रभूचे शाळेत नाव प्रथम कुलकर्णी मास्तर घेतात. भोसले मास्तर घेत नाहीत प्रभूला लहान वयातच मांग जातीच्या व्यवसायाची माहिती मिळते पड, पडीचा हिस्सा याविषयी येसाजी त्याचे वडील त्याला सांगतात पडीविषयीच्या या गोष्टी मटनाशी संबंधीत असल्याने त्याला आनंद होतो. पडीचा हिस्सा आणायला कधी कधी तो वडीलांशी जायचा येसाजीला त्याच्या बापाने सांगितलेली पुराणातली गाईची गोष्ट सर्वांना सांगतो व गाईचे मांस नको असे सांगतो त्यावेळी घरी मला नाही शिजणार म्हणून प्रभूला कसे तरीच वाटते.

प्रभू चौथीच्या वर्गातला अत्यंत हुशार मुलगा होता. मुलांच्या समोर उभा राहून नमनगीत म्हणायचा त्याच्या पाठोपाठ सर्व मुले नमनगीत म्हणत असत.

त्याच्या वर्गात पाटलाची राधा आणि कुलकर्णी मास्तरची भाची ज्योती या दोनच मुली होत्या प्रभूला ज्योती आवडायची. अभ्यासाबरोबरच इतर मुलांप्रमाणे प्रभूची उपस्थिती योग्य होती. रामकिसन येसाजीला 'येश्या' म्हणतो याचा राग प्रभूला येतो अशी हाक गावातल्या लोकांनी मांगाच्या माणसाला मारली तरी प्रभूला राग येतो. कुलकर्णी मास्तरांना फडे घेऊन त्यांच्या खोलीवर जातो. त्यावेळी त्याला संकोच वाटतो. परंतु मास्तर त्याला घरात बोलवितात. रेडीओ सर्वप्रथम प्रभू मास्तरांच्याच घरात बघतो मास्तर रेडीओची सर्व माहिती सांगतात. पहिल्यांदा त्याचे आश्चर्य प्रभूला वाटते. बशीतून मास्तरांच्या घरी त्याला फराळ खायला मिळतो. फराळ संपल्यानंतर त्याची बशी ज्योती धुते. प्रभू वडिलांबरोबर गावात जेवायला पंगतीत बसला की त्याला स्वत:च्या पत्रावळया स्वत: उचलाव्या लागत होत्या. ब्राम्हण लोक इतर जाती धर्माच्या लोकांचा बाट धरतात परंतु प्रभूला मास्तरांच्या घरी कमालीची माणूसकीची वागणूक मिळते. मास्तर त्याला चौथीनंतर आनसिंगला शाळेला जायला सांगतात एकदा प्रभू मायला 'आई' म्हणून हाक मारतो तर बायजाला त्याचे नवल वाटते. शुध्द बोलण्याचा बदल प्रभूत कुलकर्णी मास्तरांमुळे होतो. चौथीनंतर प्रभू पातूरला शाळेत जातो. तिथे त्याला करमत नाही म्हणून शाळा सोडून तो परत येतो. नंतर पारंपारिक मांग समाजाची वाजविणे, भाडळा मागणे, फडे तयार करणे अशी कामे प्रभू करायला लागतो भाडळाचे गीत म्हटल्यावर प्रभूला बारा ओंजळी गहू मिळत.

मातंग समाज लग्न कार्यात सनई चौघडा वाजविण्याचे काम करीत होता. प्रभूही लहान वयातच आपल्या पिढीजात वाजविण्याच्या कामात सनई वाजविण्याचे काम करतो. हे शिक्षण येसाजीकडूनच मिळते. तुकाराम बेल्याच्या देवीदासच्या लग्नाचे वऱ्हाड सेनगावाला निघते. वाजंत्र्यात प्रभूला वऱ्हाडाबरोबर चालत, वाजवत जावे लागते. त्याच लग्नात सेनगावच्या बौध्द लोकांच्या पंगतीला या मातंग वाजंत्र्याचा बाट होतो या अनुभवाने प्रभूची भूक जाते.

- **प्रभूचे तरुणपण :—** प्रभूचे लग्न वयाच्या १५ व्या वर्षी होते. त्याची बायको पारु तिचे वय १० वर्षाचे असते. पारु ही त्यांच्या मामाची पोरगी. प्रभूचे लग्न कमी वयात झालेले होते. प्रभूला आपल्या मांग समाजाला मिळणारी

अपमानकारक वागणूकीची जाण त्याच्या वाढत्या वयाबरोबर येत होती. मांग समाजाच्या विकासासाठी त्याचे मन नेहमी विचार करीत असे. मांगांना परंपरागत करावी लागणारी कामे, ग्रहण मागणे हा तर त्याचा अधिकार होता. प्रभू मात्र ग्रहण मागायला जात नाही शिकल्यामुळे त्याच्यात बदल झालेला होता. त्याच्या वयाच्या मुलांना बापजादयांची गावकीची कामे करावी वाटत प्रभूला ही नकोशी वाटत. त्याच्या मनात नेहमी परिवर्तनवादी विचार येतात. मेलेल्या ढोरांचे मांस खाणे, ओढणे इ. कामे करीत नाही. कारण कुलकर्णी मास्तरनी प्रभूला म. फुल्यांच्या पुस्तकांची व विचारांची ओळख करुन दिलेली होती. सरंपचाची मेलेली गाय ओढायला प्रभू नकार देतो. येसाजी भगवान पाटीलांच्या मदतीने प्रभूला कुलकर्णी तहसिलदाराकडून १५ मे १९७१ रोजी कोतवाल पदाची ऑर्डर मिळवून देतो. प्रभूला मुलगा होतो. त्याची जन्मतारीख लिहून ठेवायला येसाजी सांगतो. वडगावात तायडे गुरुजींना खोली बघून देणे प्रभूला जमत नाही. गणाच्या खोलीत तायडे गुरुजी रहायला जातात त्याचे प्रभूला वाईट वाटते. बौध्दांच्या एकजुटीचे ज्ञान प्रभू गुरुजींकडून घेतो. 'अखिल महाराष्ट्र मातंग संघ' व भोपळे साहेबांविषयी प्रभू तायडे गुरुंजीकडून ऐकतो. तसेच त्याच्या शाखा, अण्णाभाऊ साठे यांची माहिती प्रभूला गुरुंजीकडून मिळते. गवना—साधला भांडणात प्रभू तायडे गुरुजींच्या मदतीने महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

कोतवाल असल्यामुळे प्रभूची कार्यकारणीत निवड होत नाही. साठेसाहेब गणा व मित्र यांची कार्यकारणी निवडतात कार्यकारणीच्या जरी प्रभू बाहेर असला तरी संघटनेचे कार्य तळमळीने करीत होता. तायडे गुरुजींच्या बदलीची ऑर्डर प्रभू चार दिवस उशीरा घ्यायला लावतो. गुरुजींच्या बदलीने वडगावच्या चळवळीचे नुकसान त्याला दिसते. आंबेडकर बौध्दांचे म्हणून येसाजी ६ डिसेंबरच्या कार्यक्रमाला येत नाही. प्रभू त्यांच्या मनातला गैरसमज दूर करतो. येसाजीच्या मनात आंबेडकरांविषयी नवी दृष्टी प्राप्त होते. चळवळ चालू झाल्यापासून यंका फक्त गावकीची कामे करीत होता. पण मुद्दाम कुणबी प्रभूला कामे सांगत. प्रभूची सर्वांशी समन्वयाची भूमिका होती. वाशिमचा चळवळीचा कार्यक्रम झाल्यानंतर वडगावचे कुणबी मातंगावर बहिष्कार टाकतात त्याचा मानसिक

त्रास प्रभूला होतो. गणाचा त्रास सर्वात जास्त प्रभू व सर्व समाजाला असायचा. प्रत्येक कामात आडकाठी करीत असल्यामुळे गणाचा राग यायचा प्रभूची वर्ग मैत्रिण ज्योतीमुळे वाशिमला येसाजीवर उपचार होतात. मेलेला बैल ओढत नाही. म्हणून राजाराम आणि लिंबा यंकाला मारहाण करतात. त्यावेळी अ.म.मातंग संघाच्या विशिम शाखेकडे प्रभू यंकाला घेऊन जातो. प्रा. आंभोरे याचा सल्ला ऐकून संघटनेच्या सल्लागार पदाचा राजीनामा देतो.

लोकसभेच्या, विधानसभेच्या निवडणूकीवेळी प्रभूला स्पष्ट लक्षात येते की जातीपातींच्या राजकारणाने आपला इतिहास भरलेला आहे. त्यामुळे राजकारणाची त्याला किळस येते. "राजकारण हे श्रीमंतीचं आणि बदमाशांच आहे. आपल्या सारख्या गरीब खालच्या जातीतल्या माणसांनं राजकारणाच्या वाऱ्यालाही उभं राहू नये..." ('वारुळ' पृ.० ३३५) असे त्याला वाटू लागते त्यामुळे तो सल्लागार पदाचा राजीनामा देतो. दौलतराव भालेराव यांच्यासाठी व संघटनेसाठी राजकारण आवश्यक आहे हे प्रभूला साठे सांगतात. सवर्णांनी लावलेल्या मातंग वस्तीच्या आगीची पाहणी करताना तिथल्या मान्यवरांशी प्रभू चर्चा करतो. ना लहानेंच्या चळवळी विषयक वक्तव्याने प्रभू भारावून जातो. शाळा सुरु होताच मांगवाडयातल्या घरोघरच्या मुला मुलींची नावे शाळेत टाकतो. मुलांना शाळेत पाठविण्याची सक्त ताकीद देतो. गणा सोडून मांगवाडयांतून याला प्रतिसाद मिळतो. देणगीचा डबा फिरवून त्या पैशातून शाळेत शिकणाऱ्या मुलामुलींना प्रभू ड्रेस आणतो. आणि हे चळवळीचे काम आहे, असे सर्वांना पटवून देतो. गावातले लोक त्याच्या या उपक्रमाला प्रतिसाद देतात.

विकासच्या लग्नात गणाने बँड वाजविला नाही म्हणून वासिमच्या स्टँडवर विकासच्या लोकांनी गणाला मारले. त्याला वाचविण्यासाठी प्रभूच पुढे सरसावतो पण गणाला प्रभूचाच संशय येतो. याचा बदला संतोषच्या हातातून वर्गणीचा डबा गणा व त्याचे मित्र हिसकावून घेतात. अण्णाभाऊ साठे पुण्यतिथीच्या वेळी गणा आणि त्याचे मित्र अडथळा आणतात. यामुळे प्रभू मनातून उध्वस्त होतो. हे त्याचे उध्वस्तपण प्रभूची बायको पारु ज्योतीच्या मदतीने दूर करते. पुन्हा प्रभू गावात वर्गणीचा डबा फिरवून चळवळीच्या कामाला नेटाने लागतो.

त्यावर गणा जळू लागतो. १५ ऑगस्टच्या अगोदर वाघ गुरुजी आणि विनायक यांच्या मदतीने वर्गणीचा डबा फोडला जातो व त्यातून शाळेतल्यामुलांना कपडे घेतली जातात. अशाप्रकारे एक आदर्श सर्व शिक्षक आणि ग्रामस्थांना प्रभू घालून देतो. प्रभू आपल्या जातीच्या लोकांना अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाकडून कर्ज मिळवून देतो. त्यामुळे त्या लोकांना व्यवसाय करायला संधी मिळते. त्यासाठी प्रभूला साठे मदत करीत असतात. प्रभूच्या कामाची जाणिव त्याच्या जातभाईना होती त्याचप्रमाणे गणाचा प्रभूला असणारा त्रासही माहित होता. डॉ. भोपळे यांच्या पाया पडलेले आंभोरेंना आवडत नाही. प्रभूला मात्र याचे कांहीच वाटत नाही. आंभोरेंचे बोलणे मात्र भोपळेविषयीचे प्रभूला आक्रस्ताळेपणाचे वाटते. प्रा. आंभोरे अ.म.मातंग संघात फूट पाडतात व सरचिटणीस पदाचा राजीनामा देतात. या जागेवर साठेसाहेब प्रभूची निवड करतात. प्रभूचे चळवळीचे काम पाहून साठेंना वडगावची अ.म.मातंग संघाची कार्यकारणी प्रभूच वाटते. म्हणून नागपूरच्या मोर्चाचे सर्वात महत्त्वाचे काम प्रभूवर साठे साहेब सोपवितात. प्रभू चळवळीचे काम करीत असताना बौध्द समाजाचे वडगावचे नवे पांडेबुवा प्रभूला समजावून घेतात. त्यामुळे प्रभूही जात भाईची कोर्टातली कामे करु लागतो. त्याचा तो मोबदल घेत नाही. पैसे जर कोणी दिलेच तर चळवळीच्या नावे पावती फाडतो. कांही वेळेस प्रभूच लोकांना मदत करतो. कौशल्या बुद्दढीला संजय गांधी निराधार योजना मिळवून देतो. आपला मुलगा मॅट्रीक झाल्यानंतर त्यानेही मास्तर व्हावे अशी प्रभूची इच्छा असते. मास्तर होऊन समाजातील मुले शिकवावीत. प्रभू, येसाजी या दोघांचा जगण्याचा हेतूच उदात्त असा होता. दुसऱ्याच्या हितातच त्यांना आनंद मिळत होता. हिंदू देवतांची पूजा त्याला आवडत नाही त्यासाठी त्याने कधीच विरोध केला नाही लोक शिकले की त्यातील फोलपणा त्यांच्या लक्षात येईल असे प्रभूला वाटे.

वडगावच्या ग्रामपंचायत निवडणूकीत प्रभू मातंगाचा एक सदस्य निवडून देतो. त्याचा योग्य मोबदला वसूली करुन देण्याचा प्रयत्न करतो. ज्याला सरपंच व्हायचे आहे त्यांच्याकडून जास्तीत जास्त पैसा वसूल करतात. व तो सर्वानुमते कोणाही दोन व्यक्तिंच्या नावे बँकेत टाकण्याचा विचार प्रभू करतो. सरपंचपदासाठी एका सदस्याच्या मतासाठी विकास प्रभूला विचारतो. त्यावेळी प्रभू आपल्या

मातंगाच्या लोकांची मिटींग घेऊन सांगतो लिंबा बेलेही प्रभूला एका सदस्यांची दहा हजार रुपये रक्कम देतो. प्रभू परत करतो. विकासही १५ हजार रुपये देतो तर प्रभू तेही परत करतो. गावात निवडणूकीचे वातावरण जोरात चालू असते पैसे देणे घेणे यापासून दारु मटण वाटण्यापासून सगळया गोष्टी चालतात. याचे प्रभूला वाईट वाटते प्रभूवर लिंबा व विकास दबाव आणतात. प्रभूची मनधरणी करतात. मतदान होते. लिंबाचे चार, विकासचे दोन सदस्य निवडून येतात. याचा आनंद प्रभूला होते कारण त्यामुळे प्रभूच्या एका सदस्याला किंमत येणार होती. लिंबा तर स्वत:चे अस्तित्व प्रभूवर असल्याचे सांगतो. या निवडणूकीत चळवळीच्या हिताची कामे प्रभू करुन घेतो. आपल्या समाजाचा विकास साधू पाहतो मातंगाच्या मेंबरचे पैसे न्यायला गजू व प्रभूला लिंबा घरी बोलावतो तर त्याच्या अगोदरच पैसे गणा घेऊन गेलेला असतो. प्रभूला गजूही गणाच्या मनाप्रमाणे वागेल असे वाटते परंतु गजू तसा वागत नाही. त्यावेळी प्रभू म्हणतो. "लव्हाळीची काडी अन् मातंगाची जबान कव्हाच मोडत नाही." गजू प्रभूला आपला वाटतो. मातंग समाजाचा सच्चा वाटतो. त्याच्यावर प्रभू विश्वास ठेवतो आणि प्रभू सांगतो त्यालाच स्वत:चे मत देतो. सरपंचपदाच्या चर्चेसाठी प्रभूला विनायक, विकास कवठयाला बोलवून घेतात. सदस्याच्या मताला विनायक पैसे नाकारतो. त्याऐवजी सरपंच झाल्यावर विकास समाजमंदिर बांधून देईल असे विनायक प्रभूला सांगतो. प्रभूला गजूला उपसरपंच पद हवे असते. ते मिळत नाही यावर प्रभू जास्त ताणून धरतो. सरपंचाच्या निवडणूकीसाठी गजूला गणा लांब कुठेतरी घेऊन जातो याचा पाश्चाताप प्रभूला होतो. निवडणूकी दिवशी तर प्रभूला अत्यंत मन:स्ताप होतो. राजाराम मास्तर व गणा हे गजू जिपमधून घेऊन येतात. गजू विकासलाच सरपंच पदासाठी मत देतो व उपसरपंच पदासाठी नामदेव बेलेला मत देतो. गजूची मग काळजी प्रभूला वाटते. लिंबा बेले, त्याचे भाऊ व मुलांनी गणा, गजू यांना बेदम मारहान केलेली होती. गणा व गजूला दोघांना प्रभूच अनसिंगला दवाखान्यात घेऊन जातो व लिंबा बेले त्याचे भाऊ यांच्या विरुध्द पोलीसात रिपोर्ट नावानिशी देतो. अशा प्रकारे मातंग जातीत क्रांती परिवर्तन झालेले दिसून येते.

२) गणा :—

'वारुळ' या कादंबरीतील 'प्रभू' इतकी महत्त्वाची व्यक्तिरेखा खलनायकाच्या भूमिकेत असणारी गणाची आहे. यामध्ये गणाचे घराणेच आडमुठेपणाचे दाखविले आहे. हाच गुण गणातही उतरलेला आहे. वडगावातच 'प्रभू' आणि गणा यांचे बालपण एकत्रच गेले आहे. एकाच वर्गात दोघेही चौथीपर्यंत शिकले भिका गणाचा वडिल येसाजीला कायम त्रास देतो. आडकाठी येतो तर गणा येसाजीच्या मुलाला प्रभूला. गणा लहानपणापासून प्रभूचा द्वेष करतो. 'परभ्या' म्हणून हाक मारतो त्यावर कुलकर्णी गुरुजी गणाला रागावतात गणाला कामाचा कायम कंठाला आलेला असतो. तो आळशी वृत्तीचा होता. तिसऱ्या वर्गात नापास होऊन कायमचा घरात बसलेला असतो. गणाला घराण्याचा हूडपणा वारश्याने मिळालेला होता. गणाचे घर आज्या, पणज्या, बापापासून गावचा परगावचा मार खात आलेले आहेत. शाळा सोडल्यानंतर गणा बँडात जातो. सोनाळी या गावात येसाजीला गणा ड्रम वाजविताना दिसतो. त्याचवेळी येसाजीला प्रभूच्या धंद्यातील गणा हा स्पर्धक झालेला प्रत्यक्ष कळते. भिका दारुचा धंदा करुन गणाला बँडसाठी पैसे देतो. अनसिंगहून बँड आणतो आणि प्रभूचा सनई चौघडयाचा जोड बंद पाडण्याचा यशस्वी प्रयत्न करतो गणाने आणलेल्या बँडाची बातमी सर्व गावात मांगवाडयात पसरते सर्व लाहन—थोर गणाच्या घराकडे येतात. त्याचवेळी गावातला नामदेव बेले बँड बघून जगात होणारा बदल मान्य करतो तसाच गणाने सनई चौघडयाच्या ठिकाणी आणलेला बँड त्यालाही मान्यता देतो व गणाचे कौतुक करतो. बँडसाठी गणाने, त्याच्या बापाने भिकाने पैसा कोठून आणला हे सर्वांना आश्चर्य वाटते. भिकाने गावकीची कामे सोडल्यानंतर दारु गाळणे आणि विकणे असा धंदा सुरु केला होता. पण गावातल्या लोकांना भिकाने कुठेतरी डाका टाकला असा संशय येतो त्यामुळे याचा राग भिकाला येतो. गणाने बाहेर मांडलेली बँडाची बासने भिका ठेवायला सांगतो प्रभू—नाथा यांचा सनई—चौघडयाचा जोड त्याला बंद पाडायचा होता. बँड आणल्यापासून वडगावात आणि आजूबाजूच्या गावातल्या लग्नाच्या सुपाऱ्या गणाला मिळतात. दिवाळी, पोळा या सणासुदीला गावात तोच वाजवित होता.

प्रभूचा सनई—चौघडयाचा जोड बंद पाडण्यासाठी गावात एकाचवेळी दोन दोन लग्ने असली की एका लग्नात स्वत:चा व दुसऱ्या लग्नात अनसिंगचा बँड आणायला सुपारी देतो. सनई चौघडा कोणालाच लावू दयायचा नाही असा गणा पणच करतो. गणासह त्याचे सर्व भाऊ भिका सारखेच दारुचा धंदा करुन वाया जातील असे सर्वांना वाटते परंतु बँड घेतल्यामुळे सर्वजन बँडात वाजवायला लागतात. मांगवाडयात गणा तालेवार राहतो भिकाचा दारुचा धंदा चोरुन चाललेला होता. पोलीसांनी अनेक वेळा त्याला पकडून नेले, पुन्हा सोडले. एकवेळ घरातच दारुच्या बाटल्या सापडल्या भिकाला पोलीसांनी लाथा—बुक्कयांनी कपडे फाटेस्तोवर मारले. याबाबतीत भिकाला प्रभूचाच संशय येतो. याचा बदल होण्यासाठी गणाला भडकवितो. प्रभूच्या विचाराने मांगवाडयात वागणाऱ्या लोकांना आपल्याकडे वळवून बँडात सामिल करुन घेतो. आपल्या भावांसाठी गणा दुसरा बँडचा जोड घेतो. या बँडात प्रभूच्या विरोधात असणारे केशव, वसंत भीमा गणासोबत राहतात. गवनाला साधना मारते गावातली सर्व लोक तिला अनसिंगला बघायला जातात. त्यासोबत गणाही येतो हे बघून प्रभूला आश्चर्य वाटते हे सर्व राजकारण प्रभूला एकटे पाडण्याचे असते. गणा, लिंबा बेले व राजाराम यांच्या मर्जीतला होता. त्यामुळे यंका व प्रभू यांची ताकद कमी होते. गवनाला दवाखान्यासाठी प्रभूकडून घेतलेले २०० रु. यंका देतो. त्यावेळी गणाने यंकाला पाचशे रुपये दिलेले असतात. सांगितलेले असते की पोलीसांत केस देऊ नको. हे पाचशे रुपये लिंबा बेलेच गणा मार्फत देतो.

तायडे गुरुजी अण्णाभाऊ साठे जयंतीचा कार्यक्रम घेतात त्याला गावातल्या मान्यवरांसह मातंगमंडळीही येतात. ओटयावर गणाबरोबर प्रभूला बसवतात याचा गणाला राग येतो. तो म्हणतो. “काय हाये हे? माझ्या मांडीले मांडी लावून बसायले त्याले बलावता” (वारुळ पृ. २१२) गणाला गुरुजी शांत करतात रागाने तो उभा राहातो गणाचा स्वभाव, तापटवृत्ती सर्वांना माहित असते. गणा—प्रभू यांना व्यासापीठावर एकत्र आणण्याचा गुरुजींचा प्रयत्न फरतो. गणाचा मामा गणपत कांबळे त्याची समजूत घालतो. गणाला खडसावतो. गुरुजी गणा व प्रभू यांना अण्णाभाऊंच्या प्रतिमेस हार घालून पूजा करायला लावतात. प्रभूला गुरुंजींनी

ओटयावर बोलावलेले गणा व मित्रमंडळींना आवडत नाही. कार्यक्रमाच्या शेवटी गणा गुरुंजीच्याबरोबर हुज्जत घालतो. म्हणतो — "मास्तर तुम्ही फक्त शाळंत पोरं शिकवायचं काम करा. मांगवाडयात आग लावायचे हे धंदे बंद करा." ('वारुळ' पृ. २१७) गुरुजींवर गणा लिंबा बेल्याच्या मदतीने पंचायत समितीत तक्रार करतो. सभापतीला गुरुजींची बदली करायला लावतो. या कार्यक्रमापासून तायडे गुरुजी शांत राहतात याचा आनंद गाव व मित्रांना होतो. गुरुजींचे प्रभूच्या घरी जाणे गणाच्या मित्रांना आवडत नाही. त्यांना वाटते गणाने गुरुंजींना हाकलून लावावं गणा वसंताला म्हणतो. "ज्या दिसी तूं म्हणतं तसं काही व्हईल; त्या दिसी त्या मास्तरले घरातूनच काय पण गावातून हद्दपार करीन, पहाय जो मी काय मनतो ते?

संजय कांबळे, मारोती साळवे यांच्याशी ओळख गणाची तायडे गुरुजी करुन देतात. मातंग वस्ती असणाऱ्या गावात 'अखिल महाराष्ट्र मातंग संघा' च्या शाखा काढण्याच्या कार्यक्रमाचे परिपत्रक गणाच्या हाती देतात त्यात वडगाव शाखेचा अ. म.मातंग संघाचा अध्यक्ष म्हणून गणाचे नाव असते. गणाला वठणीवर आणण्यासाठी गुरुजी, प्रभू आणि साठेसाहेब यांची योजना असते. या परिपत्रात आपले नाव बघून त्याला आनंद होतो. गणा घरोघर जाऊन वाशिमला आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे पत्रक दाखवितो वाशिमच्या कार्यक्रमाच्या वर्गणीबरोबर मी एक नेता झालो हे लोकांना दाखवितो. गणा वसंतला प्रभूच्या घरात वर्गणी मागायला पाठवितो वसंताला उशिर झाल्याने त्याच्यावर तो रागावतो.

पाणीपाडया महाराजाला (विष्णू मांग) वाचविण्यासाठी गणा जातो. कारण तोही आपल्याच जातीचा आहे. हे समजते गणासोबत तायडे मास्तरही असतात. महाराजाला गावाच्या तावडीतून सोडल्यामुळे सूर्यकांत साठे गणाचा वाशिमला सत्कार करतात. व त्यापासून त्याच्या वागण्यात बदल होतो. तो वेगळयाच आविर्भात वावरतो. वाशिमला अ.म.मातंग संघाची गावोगावच्या शाखा अध्यक्षांची मिटींग असते, त्याला गणा जातो. त्याच्या सोबत गुरुजी असतात सत्कारापासून त्याच्या मनात गुरुजीविषयी आपुलकी निर्माण होते. या मिटींगला 'प्रभू' येणार म्हटले की गणाला राग येतो. संघाच्या संघटनेत प्रभू नसावा असेही त्याला वाटते. वडगावची कार्यकारणी आपण सांगू तिच साठे साहेबांनी करावी गणा व मित्रांना

वाटते. कार्यकारणीची निवड झाल्यानंतर एक वयोवृध्द सदस्य त्यामध्ये घ्यावा असे साठे सुचवितात त्याला गणा विरोध करतो. त्याऐवजी देवीदास आणि सोपान यांची नावे गणा तायडे गुरुजींना सुचवितो मात्र कार्यकारणीत प्रभूला घेतले जात नाही याचे समाधान गणाला वाटते.

वडगावच्या हद्दीत एक धरण होणारे होते. त्यामध्ये शिंदीचे बन जाणार होते या बनावर मातंग लोकांचे पोट भरत असे. या धरणाविषयी सर्व माहिती गणा मातंग स्त्रियांना सांगतो. हे धरण शिंदीच्या बनाखाली व्हावे यासाठी, गणा व मित्र प्रयत्न करतात. गणा लिंबा बेल्याच्या मदतीने आमदार, पालकमंत्री यांची भेट घेतात मात्र ते शक्य होत नाही. त्यानंतर गणा तहसिलदाराला भेटतो पण गणाची उलट तपासणी करतो. तहसिलदार गणाला बन सरकारी जागेत असून तुम्ही त्याचा ठेका न घेता त्याची तोड करता म्हणून, सरकारी मालमत्तेची चोरी प्रकरणी मी तुमच्यावर पोलीस केस करतो, असे म्हणतो. गणा घाबरतो तहसिलदाराला गणा गयावया येतो. यापुढे धरणाचा विषय काढायचा नाही असे ठरवितो. बन तोडण्याची सरकारी परवानगी घेत जा असे. गणाला तहसिलदार सांगतो. सोपान—रंजना यांची गणा समजूत काढतो. त्यांना संघटने विषयी माहिती देऊन भोपळेसाहेबांच्या कार्यक्रमाला वर्गणी घेतो. तायडे गुरुजींची बदली करण्यासाठी जो तक्रार अर्ज असतो. त्यामध्ये विनायक, लिंबा बेले यांच्या बरोबर गणाही सही करतो. मातंग समाजाच्या हितासाठी केलेली तायडेगुरुजींनी कोणतीही गोष्ट त्याला भानगड वाटते. वडगावात खऱ्या भानगडी गणाच करीत असतो. प्रत्येक कामात आडफाटे आणतो. त्याला आपल्या समाजाचं हित—अहित कशात आहे हेच समजत नाही. गणा व त्यांच्या मित्रमंडळींचे गावावाचून काहीच अडत नाही. म्हणून तो कोणालाच कुणब्यांच्या कामावर जाऊ देत नाही. कुणब्यांशी इतर लोकांनी संबंध ठेवला तर गणा आपल्याला दमदाटी करील अशी भिती होती — "गावकऱ्यांनी जर आपल्यावर बहिष्कार घातला, घरात पाय खोरु खोरु मरायची पाळी आली तरी त्याची चिंता करु नका जातीसाठी माती खा गाववाल्यांना शरण जाऊ नका." ('वारुळ' पृ. २९१) संघटनेचे अध्यक्षपद गणाला दिले. याचे सर्व लोकांना वाईट वाटते. गाववाल्यांशी गणाने जुळवून घ्यायला पाहिजे वेडंवाकडं न बोलता ताण

कमी करायला पाहिजे असे सर्व लोकांना वाईट वाटते. गाववाल्यांशी गणाने जुळवून घ्यायला पाहिजे, वेडंवाकडं न बोलता ताण कमी करायला पाहिजे. असे सर्व लोकांना वाटते. पण तो सर्व लोकांना धमकावायचा मातंग लोकांना गाववाल्यांच्या विरोधात भडकावायचा. त्यामुळे कुणब्यांचा काहीच तोटा होणार नसतो. उलट मातंग लोकांनाच त्याचा त्रास सहन करावा लागतो. येसाजीने सांगितल्यावर सर्वजन कुणब्यांच्या कामावर जातात. येसाजीला वाशिमला दवाखान्यात गणा बघायला येत नाही. वडगावच्या पाटीलकीसाठी गणा अर्ज भरतो. संघटनेचा अध्यक्ष झाल्यापासून कुणब्यांवर स्वतःचा वचक बसवायचा प्रयत्न करतो अगोदर मातंगाना त्याने दाबून टाकलेच होते. लहुजी साळवे यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम गणाच्या दारात घेतलेला असतो. प्रा. मच्छिंद्र आंभोरे यांचे भाषण चालू असताना गणा मात्र इतर पदाधिकाऱ्यांसह गप्पा मारीत बसतो. गणा अध्यक्ष झाल्यापासून प्रभूला कधीच जुमानत नव्हता. चळवळीला पोषक अशा गोष्टीला सारखा अडथळा आणायचा प्रभू याकडे दुर्लक्ष करायचा.

गणा पाटीलकीच्या भानगडीत पडला तरी त्यांचा बँड गावात चालू होता. संभा बेल्याचा मेलेला बैल यंका गणाला विचारल्याशिवाये टाकीत नाही. डॉ. भोपळेचे विचार तो लक्षात घेतो. बैल ओढण्यास नकार देतो. लिंबा, राजाराम व त्याच्या पोरांनी यंकाला मारतात. राजारामने यंकाला पैशाच्या भानगडीवरुन मारले होते. त्यामुळे दुसऱ्यांदा यंकाला मारलेले गणाला चळवळीशी त्याचा संबंध नाही असेच वाटेत. यंका प्रभू यांना हे योग्य वाटत नाही. यावर गणाने गावपातळीवर किंवा तालुका पातळीवरुन काहीतरी करावे असे त्यांना वाटते. संघटनेचा सदस्य असणारा केशव तोही यंकाकडे दुर्लक्ष करतो. लिंबाला प्रभूविरुध्द भडकावण्याचा प्रयत्न गणा करतो. चळवळीत असला तरी गणा आपल्याच लोकांना नाहक त्रास देतो. विकासच्या लग्नात गणाचा बँड असतो. अगोदरच बँडवाले ट्रकमध्ये बसल्याने गाववाल्यांनी त्यांना बाहेर उतरविले तिथे भांडण होते. गणाच्या बँडविना विकासचे वऱ्हाड जाते. त्याचा परिणाम म्हणजे विकास वाशिममध्ये गणाला आपल्या लोकांना मारायला लावतो. खंडाळयाच्या थोरातांच्या प्रकरणात ना. लहाने साहेबांनी प्रभूला जो मान दिला तो गणाला बघवत नाही. प्रभू लहूजी साळवे, अण्णाभाऊ साठे

यांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या साध्या पध्दतीने साजऱ्या करायच्या ठरवितो त्यासाठी गणा सहकार्य करीत नाही उलट गणाला वाशिमला विकासचे लोक मारतात त्यावेळी प्रभूच सोडवितो. गणाने मार खाल्ला याचे सर्वांना बरे वाटते. सर्व गावाशी, मातंगांशी गणा रग्गेलपणा व मगरुरीने वागत होता. प्रभूने सोडविले हे गणाला नाटक वाटते. प्रभूने गणावर कुरघोडी केली असा आरोप साठेंजवळ गणा प्रा. आंभोऱ्याच्या मदतीने करतो.

प्रभू आपल्या जातीतली मुले शिकावी यासाठी शाळा उघडतो. घराघरात जाऊन शिक्षणाचे महत्त्व सांगतो. याउलट कार्य गणा करतो. घरातील मुलांना तो आठ—दहा दिवस शाळेत पाठवित नाही. मुलगी १५ दिवस शाळेत जात नाही. म्हणून प्रभू गणाच्या घरीही जातो. त्यावेळी गणा प्रभूला शिव्या देतो. गरीब मुलांना कपडे घेण्यासाठी प्रभू वर्गणीचा डबा फिरवितो त्यालाही गणा विरोध करतो. गणाला वाटते फक्त मातंग समाजातल्या मुलांनाच कपडे घ्यावी, गावातल्या मुलांना कशाला? गाववाले चळवळीला विरोध करतात गणा प्रभूचा हा उपक्रम प्रा. आंभोरेंना सांगतो यावर अंभोरे उलट सुलट चर्चा करुन गणाला प्रभू विरोधात भडकवितात. गणाला मारले त्यावेळी ज्या अफवा पसरल्या त्या सुध्दा प्रभूनेच पसरविल्या असा आरोपही गणा आणि मित्रमंडळी करतात प्रभूचा बंदोबस्त करण्याचा यांचा बेत असतो. वर्गणीचा डबा घेऊन फिरणाऱ्या प्रभूलाही त्रास देतात, विरोध करतात. गणा म्हणतो “उद्या पाहयंटं त्यो परभ्या गावात डबा घेऊन वर्गणी माघायले निघाला की त्याला उडवा अ.म.मातंग संघाचा याले विरोध आहे मना. एकाला तं ठीक नाही एकल तं.” (‘वारुळ’ पृ. ३६८) प्रभूच्या मुलाच्या हातून गणाचे मित्र केशव, वसंता । भीमा वर्गणीचा डबा हिसकावून घेतात. स्वतःच्या दारात अण्णाभाऊंची जयंती प्रभू साजरी करतो त्याला गणा विरोध करतो. असा तुला कार्यक्रम घेता येणार नाही “मी अ.म.मातंग संघाच्या गावशाखेचा अध्यक्ष हाओ. माहया परवानगी बिगर तुले कोणताच कार्यक्रम करता येणार नाही. ना हयो कार्यक्रम घेता येणार, ना गावात वर्गणी मांघता येणार, म्या तुझ्या पोराच्या हातचा डबा आज हिसकावून घेतला.” (‘वारुळ’ पृ. ३७२) त्यावेळी गणा प्रभूशी भांडतो. प्रभू भांडण वाढवित नाही. गावातले कार्यक्रमासाठी आलेले लोक जातात. प्रभूला

अत्यंत वाईट वाटते. तो मनातून उध्वस्त होतो. त्यातून कसातरी सावरतो पुन्हा वर्गणी जमा करायला लागतो तर पुन्हा वर्गणी जमा करायला लागतो. तर पुन्हा गणा त्रास देतो.

पोळयाचे बँडाचे पैसे गणा घेतो गया बुद्धी मरते त्यावेळी गणासोबत असणाऱ्या केशवला गणा प्रभूला राखेला हात लावू देत नाही. आपल्या पाच भावांतून गणा वेगळा निघतो बँडातून मिळालेला पैसा कोणालाच देत नाही. त्यावेळी गणाचा भाऊ गजू प्रभूला येऊन मिळतो. कारण गजूला माहित असते. प्रभू सारखे नि:स्वार्थीपणे काम करणे गणाला जमणार नाही. धाक दाखवून गणा लोक जवळ करतो, पण त्याच्या धाकालाही लोक कंठाळले होते. तेच लोक प्रभूला मानित होते. जामटीच्या सिंधीच्या बनात प्रत्येकाला जायला प्रभू परवानगी देतो. तिथेही गणा विरोध करतो. आंभोरेंच्या विचारांचाच गणा असतो. अ.म.मातंग संघ सोडून बाहेर पडण्याचा त्यांचा विचार असतो. अ.म.मातंग संघ वडगावचा अध्यक्ष असणारा गणा आंभोरेंनी स्थापन केलेल्या स्व. अण्णाभाऊ साठे क्रांतीदलात मित्रांसह सामिल होतो. मातंग समाजाचा नागपूर विधान भवनावर भव्य विराट मोर्चा घेऊन जाण्याचा निर्णय डॉ. भोपळे साहेब घेतात. त्याची पोस्टर्स प्रभू कार्यकर्त्यांच्या मदतीने लावतो तर गणा, भीमा ते फाडून टाकतात. या मोर्चासाठी लोक गेलेले पाहून गणा त्यांच्यावर रागावतो.

गणाचा भाऊ बाजीरावची बायको मीरा बाहेरख्याली आहे. तिचे राजरामशी संबंध असतात त्याचा राग गणाला येतो. ग्रामपंचायत सदस्यासाठी सदाशिवचे सुचविलेले नाव गणाला आवडत नाही. प्रभू नंतर गजूचे नाव सुचवितो ते मात्र सर्वांना मान्य होते. सरपंचासाठी मतदान करताना जो उमदेवार जास्त पैसे देईल त्यालाचे सर्वानुमते मत दयायचे व त्यातून एखादे समाजमंदिर बांधायचे पण त्या अगोदर पैसे कोणाच्या नावे बँकेत ठेवायचे यावर गणा ताणयला सुरुवात करतो. सरपंच निवडणूकीसाठी प्रभू इतकाच गणा महत्त्वाचा वाटतो. चळवळीसाठी सरपंच निवडणूकीला गणा प्रभूला मदत करतो. त्यामुळे चळवळीचा फायदा पण मातंगाच्या एका मेंबरचे पैसे प्रभू, गजू यांच्या अगोदर गणा लिंबाबेल्याकडून घेवून जातो. गजूला लपविण्याचा प्रयत्न करतो. सरपंच निवडणूकीसाठी गणा गजूला घेऊन

येतो. गजू सरपंच म्हणून विकासला तर उपसरपंच म्हणून नामदेवला मत देतो. लिंबा बेले व त्यांचे भाऊ, मुले गणा गजूला बेदम मारतात. लिंबा बेले, त्याचे दोन भाऊ, मुले यांच्यावर प्रभू नावानिशी पोलीसांत केस करतो. गणा व गजू यांना दोघांना अनसिंगला दवाखान्यात नेतो. प्रभूला ही आपल्या जातीचा आपल्यापैकीच एक आहे असा विचार येतो.

**३) कुलकर्णी मास्तर :—**

वडगावच्या शाळेत प्रभूला कुलकर्णी मास्तर ४ थीच्या वर्गाला शिकवायला होते. ते फार चांगले शिकवित असत. प्रभू वर्गातला हुशार विद्यार्थी असल्यामुळे मास्तर त्यालाच प्रश्न विचारित असत. या कादंबरीच्या सुरुवातीसच मास्तरांची व्यक्तिरेखा आलेली आहे. प्रभूला मास्तरांनी प्रश्न विचारलेला असतो. त्याचे उत्तर देतो. मास्तर प्रभूवर खुष होतात आणि प्रभूला सांगतात तुझा जन्म ही १९४७ साली झालेला आहे. देश स्वातंत्र्य झाल्या बरोबर मानवतेचा अंगिकार केलेल्या गुरुर्जींनी प्रभूही जाती धर्मांच्या जोखडातून स्वातंत्र्य झाल्याचे अप्रत्यक्षपणे सुचवितात. भोसले गुरुजी सारखे शिक्षक महार—मांग जातीच्या मुलांना शाळेत घेत नाही. कुलकर्णी मास्तर तसे करीत नाहीत. प्रभूचे नाव प्रथम कुलकर्णी मास्तरच शाळेत घेतात. कुलकर्णी मास्तरची भाची ज्योती ही प्रभूच्याच वर्गात होती. वर्गातला हुशार विद्यार्थी असल्याने कुलकर्णी मास्तर प्रभूला प्रार्थना, संरस्वतीचे नमन गीत म्हणायला लावीत असत. कुलकर्णी मास्तरांनी चौथीच्या प्रत्येक मुलाने एक—एक दिवस पुढे येऊन नमन गीत म्हणायचा दंडक घातला होता. प्रभूचे नमनगीत म्हणून झाले की गुरुर्जींनी सुविचार सांगितला. "माणूस कर्माने मोठा होतो, जातीने नव्हे." ('वारुळ' पृ. १८) शिकविताना कुलकर्णी मास्तरांचे मुलांच्या कपडयाकडे लक्ष असे भोसले मास्तर डोक्यात टोपी नसलेल्या विद्यार्थ्याला दटावत. कुलकर्णी मास्तर मात्र त्याकडे दुर्लक्ष करीत कुलकर्णी मास्तर आधुनिक विचारांचे होते. बदलत्या परिस्थितीचे त्यांना भान होते. शहरात कित्येक वर्षे त्यांनी वास्तव्य केलेले होते. त्याचे आचार, विचार, उच्चार शुध्द असल्यामुळे प्रभूला मास्तर जास्त आवडतात. चावडीत चार वर्ग बसत नाहीत, म्हणून कुलकर्णी मास्तर पाटींलाना

त्यांच्या घरी जावून सांगतात. शिकविताना मुलांना अडचण येते. मारोतीच्या पारावर दोन वर्ग बसविण्याची गुरुजी पाटीलांकडून परवानगी मिळवितात. पण रामा बेल्यासारख्या कुणब्यांना शाळेतल्या महारामांगांच्या पोरांमुळे आपला देव बाटेल असे वाटते. त्यालाही मास्तर तोंड देतात.

कुलकर्णी मास्तर शाळेत असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना शुध्द बोलायला, हाक मारायला शिकवितात. त्याबरोबर प्रभूलाही सांगतात. प्रभूला आपल्याला दोन फडे तयार करुन आणायला सांगतात. राघो तेल्याच्या घरी प्रभू आईने तयार केलेले फडे प्रभू मास्तरांना नेऊन देतो. मास्तरांना मुलबाळ नव्हते. बायको आणि त्यांची भाची ज्योती एवढीच माणसं त्यांच्या घरात होती. मास्तर प्रभूला घरात बोलवितात. ऐसपैस बसायला सांगतात. तिथे प्रभूला मिळालेल्या वागणूकीने तो भारावून जातो. मास्तरांच्या घरात प्रभू सर्वप्रथम रेडिओ पहातो. रेडिओ कसा हाताळायचा ते मास्तर शिकवितात. मास्तरांची भाची प्रभूला व मास्तरांना बशीतून फराळ आणून देते. अशा बशा त्याने पाटीलांच्यात पाहिलेल्या होत्या त्यात पहिल्यांदा खायला, प्यायला मास्तराच्या घरी मिळाले होते. प्रभूला तिथे संकोच वाटतो. मास्तर जात—पात मानीत नव्हते. प्रभू स्वत:ची बशी धुवून आणायला बाहेर जातो. मास्तर त्याला विरोध करतात. बशीतच त्याला हात धुवायला सांगतात. मास्तरांच्या अशा वागण्याचे प्रभूला आश्चर्य वाटते. कारण कुणब्यांघरी येसाजी जेवायला गेला की त्यांच्या पत्रावळया त्यांनाच उचलाव्या लागत होत्या. कुलकर्णी मास्तरांच्या मते. "प्रभू मी म्हणतो ते ऐक मी अस्पृश्यता पाळत नाही मला माझ्या बायकोला तुझा बाट होत नाही. मी जसां माणूस आहे तसा माझ्या दृष्टीने तूंही ठेव ती बशी खाली धू तिच्यात हात." (वारुळ पृ. क्र. २६) मास्तरांनी अशा प्रकारे दिलेल्या वागणूकीने प्रभूला नवल वाटते. मास्तर प्रभूला सांगतात शहरात बाट मानीत नाहीत. जुन्या काळी सोवळे ओवळयाच्या गोष्टी ब्राम्हणांनी सुरु केल्या आणि त्यातील फोलपण लक्षात आल्यानंतर त्या सोडण्यात ब्राम्हणच पुढे सरसावले शहरात याविषयी सुधारणा होते. मात्र खेडयात अजूनही त्या गोष्टी पाळल्या जातात. भोसले मास्तरांविषयी कुलकर्णी मास्तर म्हणतात. अशिक्षित माणसांपेक्षा शिकलेले लोक अत्यंत वाईट वागतात. भोसले मास्तर कटटूर अस्पृश्यता पाळतात.

मास्तर प्रभूला व्यक्तिच्या कर्तव्याविषयी सांगतात — माणूस कर्तव्य बजावयाला लागला की त्याला आपोआपच मोठेपण मिळतो. ब्राम्हण जर चोऱ्या करायला लागला तर त्याला कोण श्रेष्ठ मानणार नाही. आंबेडकरांविषयी मास्तरांना आदर आहे. आंबेडकर महार समाजात जन्मले तरी त्यांची थोरवी श्रेष्ठ आहे. असे ते प्रभूला सांगतात. आंबेडकरांसारखा विद्वान जगात नाही असे मास्तरांचे मत असते. प्रभूच्या घरची परिस्थिती मास्तरांना माहित आहे. म्हणून फडयाचे आठ आणे ते प्रभूजवळ देतात. बायजा ते मास्तरांना परत दयायला लावते. शाळा सोडल्यानंतर प्रभू सनई चौघडयाच्या जोडात जातो एका लग्नात त्याचा अपमान होतो. त्यावेळी प्रभूला कुलकर्णी मास्तरांची आठवण येते म. फुले यांचे 'अखंड' मधील अस्पृश्यतेबद्दलचे विचार मास्तरांना माहित होते ब्राम्हण असूनही मानवतावादी दृष्टीने दलितांकडे बघणारी ही एक व्यक्तिरेखा आहे.

**४) येसाजी:—**

ही एक कादंबरीभर येणारी महत्त्वाची व्यक्तिरेखा प्रभूच्या वडीलाची आहे. येसाजी जातीने मातंग असून वडगांवचा येसकर आहे. त्याचा गावातल्या प्रत्येक घटनेशी घडामोडीशी संबंध येतो. प्रत्येक घटनेचा घडामोडीचा अन्वय लावता येण्याची दृष्टी या येसाजीची आहे. त्याचा संबंध जसा गावच्या पाटलांशी हरघडी येतो. तसाच प्रांतसाहेब, मामलेदार आणि इतर सरकारी अधिकाऱ्यांशी सतत येतो. येसाजीला त्यामुळे पडीची कामे करायला वेळ नाही पडीची कामे इतरांना म्हणजे भिका, हारजी, नाथा चहादू संपत इ. ना दिलेली असतात. येसाजी भगवान पाटीलांच्या बैठकीत बसत असे. भगवान पाटीलांचा येसाजीवर विश्वास होता. योसाजीही कोणत्याही कामात भगवान पाटीलांचा सल्ला घेऊन काम करीत असे येसाजी अठवडयाचा रिपोर्ट आनसिंगला पोलीस स्टेशनला दयायचा गावातल्या लोकांना त्यांचे आश्चर्य वाटत होते. येसाजी संपत चहादू, नाथा, भिका ही मातंग समाजाची पहिली पिढी होती. कामाची वाटणी करताना पोलीस, पोलीस स्टेशन म्हटले की सर्वच जण भ्यायला लागले. त्यावेळी पाटील येसाजीला म्हणाले

हे रिपोर्ट देण्याचे काम तूच कर. कारण साहेब लोकांशी बोलणे, व्यवहार करणे त्याला जमत होते.

येसाजीला पडीचा हिस्सा घेऊन जाण्यासाठी यंका निरोप देतो तो आणण्यासाठी येसाजी जात असताना त्याला वाटेत मातंगांची उपेक्षा करणारा शिदनाक भेटतो. गावकीच्या कामातील लाचारी आंबेडकरांनी बौध्दांना कशी सांगितली आणि त्यातून बौध्द समाज कसा सुधारला? हे शिदनाक सांगतो बौध्दांसारख्या मातंग समाजाला घाणीतून वरं काढण्यासाठी एखादा नेता मिळेल असे शिदनाक सांगतो परंतु येसाजीला ते फालतू वाटते वडगावचे महार आणि मांग यांच्यात पूर्वीपासून वितुष्ट होते. बौध्द मातंगांना हलके समजत मातंगांना तर बौध्द शत्रूच वाटत. गावाच्या रचनेत मांगवाडा, बौध्दवाडा यांची ठिकाणं ठरलेली आहेत. कुणबी ब्राम्हण यांच्या तुलनेत बौध्द मांग हलकेच परंतु हा दोन्हीही जातीत असणारा संघर्ष, समाजात असणाऱ्या उतरंडी यांच्या विचाराच्या गर्तेत येसाजी आहे. येसाजी गायीचे मांस खात नाही. कोणाची गाय मेली तर मला सांगू नका असे तो हारजीला सांगतो. येसाजीला त्याच्या बापाने कपिला गायची पुराणातली गोष्ट सांगितलेली असते. त्यामुळे तो गायीला माता मानतो. येसाजी श्रध्दाळू आहे.

भगवान पाटील आणि येसाजी यांचे संबंध चांगले होते पाटीलांच्या कोणत्याही कामात तो सहभागी असायचा येसकार व्हायच्या अगोदर त्याचा सनई–चौघडयाचा जोड होता. येसकर झाल्यानंतर तो नाथाला देवून टाकतो. भिका त्यात नाथाला आडकाठी करतो भिकाच्या ठिकाणी येसाजी सनई वाजवायला प्रभूला पाठवितो पोंघडा कसा वाजवायचा दम कसा घ्यायचा शिकविण्यासाठी येसाजी नाथाला सांगतो. विश्वास बेल्याची गाय ओढण्यासाठी भिका आड येतो. भिकाला वाटते येसाजीनेही ढोर ओढावं सोलावं. सोनाटीच्या जगान्नाथ पाटीलांच्या पोरीच्या लग्नात वाजविले नाही म्हणून पाटील भिकाला मारतो त्याचा राग भिका येसाजीवर काढतो भिकाला आपल्याला मारण्यात येसाजीचाच हात असावा असे वाटते. येसाजी जगन्नाथ पाटीलांची समजूत घालाण्याचा प्रयत्न करतो पण पाटील ऐकत नाही. अनसिंगच्या बाजारात पाटील ऐकत नाही. अनसिंगच्या बाजारात पाटील भिकाला मारतो.

येसाजीसाठी हारजी, नाथा, स्वत:चा जीव देण्यासाठी तयार आहेत. येसाजी कोणतीही गावकामदारकीची कृती करतो त्याला भिका सोडला तर प्रत्येकाचा पाठींबा असतो. भिकाची पोरगी आजारी असताना येसाजी आपले सर्व मतभेद विसरुन तिला बघायला जातो. येसाजीचा कवठयाचा महुणा संतराम प्रभूच्या लग्नाविषयी त्याला बोलतो तेंव्हा येसाजीला स्वत:च्या घराविषयी काळजी वाटते. आपल्या घरात प्रभू—त्याची बायको, बायजा व आपणाला फिरता—वावरता यावे असे मोठे घर असावे असे त्याला वाटते.

मुलगा प्रभू लहान वयात सनई वाजवितो, याचे येसाजीला कौतुक वाटते येसाजी त्यासाठी प्रभूला एक सनई विकत आणून देतो. सनईच्या स्वरांची ओळख नाथाच्या मदतीने करुन देतो. मांडयांसोबत येसाजीला मटन आवडते भिकाची पोरगी आजारी असल्यामुळे तो बायजाला कोंबडे कापू देत नाही. प्रभूला सनई वाजविण्याचे धडे येसाजी स्वत:ही देतो मर्तिकाचे वाजविणे कसे उलटे असते ते प्रभूला सांगतो अनसिंग ठाण्याचा अधिकारी खंडाळयाला जाण्यासाठी दमणीने येतो. कंटाळतो त्यावेळी भगवान पाटील त्याला घोडे देतात व त्यासोबत येसाजीला जावे लागते. अधिकारी वाशिमला गेल्यांनतर येसाजी तसाच कवठयाला पारुला आणायला जातो. तेव्हा बँडचा आवाज त्याच्या कानावर येतो. बँड बघायला गेल्यानंतर भिकाचा गणा त्या बँडात ड्रम वाजवित असलेला दिसतो बँड सनई चौघडयाला स्पर्धक निर्माण झालेला असतो. यामध्ये जित गणाची की प्रभूची होईल हा प्रश्न त्याला पडतो.

बौध्दांसारखे जीवन आपल्याला, आपल्या जातील जगता यावे असे येसाजीला कायम वाटते. बौध्दांना कुणबी कसे दबकून वागतात, तसेच मातंगांनाही कुणब्यांनी दबकून रहावे असेही त्याच्या मनात येते मातंगांनी बौध्दांसारखे सुधारावे शिदनाक आंबेडकरांच्यामुळे सुधारतो, येसाजीला हा शिदनाक आवडत नाही कारण पूर्वी हा शिदनाक कोणाशीच सरळ वागला, बोलला नाही. येसाजीही शिदनाकाशी त्याप्रमाणे वागतो. पंडीत नेहरु मेल्याची वार्ता येसाजीला भोसले मास्तरकडून समजते येसाजीला त्याने धक्का बसतो. येसाजीच्या मनात विचार येतो की नेहरुच्या

मृत्यूमुळे त्या गावातील मातंग लोकांच्या पायाला चैन नसेल नेहरुंच्या मर्तिकाचा निरोप देण्यासाठी ते गावोगावी फिरत असतील.

भिका येसाजीला नेहमी त्रास देतो. त्यासाठी येसाजीच्या मनाविरुध्द कोणतीही कृती करीत असायचा. नाथाचा मेहुणा नामदेव साठे नाथाला व येसाजील आनंदा बेल्याची जमिन घ्यायला लावतो. परंतु नाथा व येसाजी त्याला नकार देतात मेलेली गाय ओढायला केशव प्रभूला बोलवितो येसाजीला वाटते प्रभूने ही कामे करुच नये. भावकीतल्या लोकांनी ही येसाजीला ढोर ओढण्याविषयी कधी सांगितले नाही. वडीचा हिस्सा मात्र त्याला नेहमी भेटायचा. म्हणून येसाजी भावकीचे उपकार मानतो. भगवान पाटलाच्या मदतीने प्रभूला कोतवाल म्हणून नेमण्यास तहसिलदारास सांगतो नातू झाल्याचा आनंदही बायजाप्रमाणे येसाजीला होतो. त्यामुळे नातावाचे तोंड कधी बघतोय असे त्याला होते. प्रभूला नातवाची जन्मतारीख लिहून ठेवायला सांगतो कारण शाळेत नाव टाकायला कामी येते. नातवाच्या बारशाला गेल्यानंतर उंबरकर मास्तर त्याला भेटतात उंबरकर मास्तरांच्या खोलीत आंबेडकरांचा, फुलेंचा फोटो लावलेला त्याला दिसतो. उंबरकर गुरुजींच्या बोलण्याने येसाजीला वडगावच्या सिदाजी बौध्दांची आठवण येते. सिध्दाजीच्या बोलण्याचा कंठाळा जसा येसाजीला येतो तसाच उंबरकर मास्तरांच्या बोलण्याचा येतो. १४ एप्रिलला नातवाचा जन्म झाल्यामुळे त्याचे नाव भीमराव ठेवा. असे उंबरकर गुरुजी येसाजीला सांगतात त्याचा राग येसाजीला येतो. उंबरकर गुरुजींना खडसवावे असे त्याला वाटते पण आपला राग आतल्या आत शांत करतो नातू झाल्यामुळे वडगावच्या मांगवाडयातील लोक हौसेने सनई—चौघडा, पोंघडा, डफडे घेऊन गुडी मागायला येसाजीच्या घरी येतात. तेंव्हा त्यांना येसाजी जेवायला घालतो. बायजा खर्चासाठी कुरकुर करते पण तो तिला समजावतो:— "आवं, हे भावकीचे मांग केव्हा आपल्या दारात आले? आता त्याहयले एक निमित्त सापडलं; त्याच्यानं सगळयाहयलें हौसला वाटला. मंग आपण तरी कां' चिंगुपणा करायचा? हौस फेडायची संधी दिली देवानं, मंग पैशाची काळजी करत बसून ती काऊन गमावू?" (वारुळ पृ. क्र. १३७)

गावातल्या बदलत्या राजकारणावर येसाजी निराश असतो १९७३ च्या दुष्काळाचा फटका वडगावालाही बसतो. सर्व मातंग लोक दुष्काळात परगावाला, परदेशला जाण्याचा विचार करतात त्यावेळी येसाजीची विचारपूस करतात. दुष्काळात आपल्या समाजातील लोकांना तो मदत करीत असतो. प्रभूचा पगार मिळतो त्याचे मजेत चालते. परंतु आपल्या समाजातील लोकांची स्थिती वाईट असते त्यालाही योग्य वाटत नाही. स्वत:ला अपराधी समजतो. समाजातल्या बायका पोरांची चौकशी करून दहा पाचाची मदत दुष्काळात करतो. प्रभूची कोतवालकी मांगवाडयातल्या दुसऱ्याला दयावी असे त्याला वाटते. मात्र प्रभू इतके शिकलेले मातंग समाजात वडगावात कोणीच नसते. दुष्काळात गावकीचे काम कोणालातरी एकालाच करु दया. असा सल्ला देतो. त्यामुळे त्या एकटयाचं तरी पुरेसे पोट भरेल. सगळयाजनांनी दुष्काळात गाव सोडताना येसाजीचा सल्ला व निरोप घेतला. त्यावेळी येसाजीला वाईट वाटते. सर्वजन येसाजीच्या शब्दाखातर जीव दयायला तयार होते.

येसाजीला पोटदुखीचा आजार होता. तो अधूनमधून डोके वर काढायचा. त्याला वाशिमच्या सरकारी दवाखान्यात ॲडमिट केले जाते. तिथे कुलकर्णी मास्तरची भाची ज्योती त्याची काळजी घेते. तो बरा होतो व प्रभूला म्हणतो "आता भिउ नको मी मरत नाही. मले डॉ भोपळे सायबानं सुरु केलेली चळवळ पहायची...." (वारुळ पृ क्र.३०६) वाशिमला त्याला सर्व पाव्हणे बघून जातात. तायडे मास्तर मातंग समाजात सुधारणा घडवून आणतात त्याला येसाजी पाठींबा देतो. तायडे मास्तरांचा त्रास तो स्वत: बघतो गवना—साधना यांच्या भांडणात गणाची वेगळी चाल तो मास्तरांना सांगतो. अशिक्षित असल्यामुळे अन्यायाला तोंड देऊ शकत नाही असे मास्तरांना सांगतो. बौध्दांसारखा आपला समाजही एकजूट व्हावा. असे त्याला मनोमन वाटते. मास्तरांची बदली रद्द करण्यासाठी येसाजी प्रभूला सूर्यकांत साठेंचे नाव सुचवितो. आंबेडकरांच्या निर्वाणादिनी (६ डिसेंबर) असणाऱ्या भोपळे सायहेबांच्या कार्यक्रमाला तो जात नाही त्यावर प्रभूला त्याचे कारण सांगतो.

"हे पहाया गडया, तुमच्या आजच्या कार्यक्रमाले मी येत नाही, काऊनं तं त्यो कार्यक्रम आज हाये मनून?

आज म्हणजे,

'आज म्हणजे आंबेडकरबाबाच्या मरणाच्या दिवशी." (वारुळ पृ. क्र.२९१) आंबेडकर बौध्द लोकांचा. बौध्द—मातंग पटत नाही. म्हणून आपला आणि त्यांचा संबंध काय? असा विचार तो करतो. समजूत घातल्यानंतर वाशिमच्या कार्यक्रमाला येसाजी जातो. प्रभू त्याच्यामनात आंबेडकरांविषयी जिव्हाळा, आपुलकी निर्माण करतो. वाशिमच्या कार्यक्रमानंतर मातंग लोक गावकीच्या कामावर बहिष्कार टाकतात. गावात मजूरीसाठी गणा कोणाला जाऊ देत नाही. त्यावर उपाशी कोणीच राहू शकत नाही. असे तो प्रभूस सांगतो. परंपरेने पाटीलकी भगवान पाटीलांच्याकडेच असावी. अशी त्याची इच्छा असते. गणा संतोषच्या हातून वर्गणीचा डबा हिसकावून घेतो. त्यावेळी संतोषला येसाजी धीर देतो व गणाला शिव्याशाप देतो.

प्रभू समाजासाठी काम करतो याचे येसाजीला बरे वाटते. अण्णाभाऊ साठे जयंतीला गणा अडथळा आणतो, संतोषच्या हातून वर्गणीचा डबा हिसकावून घेतो. याचा प्रभूच्या मनावर खोल परिणाम होतो. येसाजी प्रभूची समजूत घालतो. गावातल्या लोकांना बोलावितो, प्रभूला हिंमत हारु नको असे सांगतो. येसाजी दुःखी होतो. पारु ज्योतीला घेऊन येते व प्रभूची समजूत काढायला लावते. याचे आश्चर्य येसाजीला वाटते. येसाजी आजारी असताना याच ज्योतीमुळे आपण वाचलो, प्रभूलाही तिनेच वाचविले, म्हणून ज्योतीचे उपकार मानतो. पारुचेही कौतुक त्याला वाटते. गणवेश वाटपाच्या कार्यक्रमाला १५ ऑगष्टला शाळेत प्रभू बरोबर जातो. प्रभूंचा शाळेत सत्कार होतो. त्याचा आनंद त्याला होतो. सरचिटणीस झाल्यानंतर प्रभू बरोबर येसाजी वाशिमला प्रभूच्या कार्यक्रमाला जातो. प्रभू, येसाजी यांचा समाजासाठी जगण्याचा हेतूच उदात्त होता. बटुवामन—बळीराजा यांची गोष्ट मातंग समाजाला कशी लागू पडते हे येसाजीने पारु—प्रभूला सांगितले संतोषची पिढी येसाजीला सुख समाधान देणारी स्वर्गा—सारखी पिढी वाटते. संतोषला

परीक्षेला जाताना 'आंबेडकरांसारखा मोठा हो' सांगतो. यावरुन आंबेडकरांचे मोठेपण त्याच्या लक्षात आलेले दिसते.

सरपंचपदाच्या निवडणूकीत मातंगाच्या एका सदस्याला जास्त किंमत येते. ती मातंगांनी दाखविलेल्या एकीच्या बळाला त्याचा आनंद येसाजीला प्रभूमुळे होतो मातंग समाजाला चळवळीमुळे आणि प्रभूच्या धडपडीमुळे एक दर्जा प्राप्त होतो हे येसाजीच्या लक्षात येते तो या परिवर्तनवादी चळवळीला 'वारुळ' म्हणतो व या 'वारुळा' ला कुणब्यांपासून वाचविण्यासाठी प्रभूला सांगतो. कुणब्यांना डोमे नाग संबोधतो हे नाग स्वार्थी आहेत. यापासून आपल्या मांगवाडयाचे रक्षण करावे लागेल असे प्रभूला सांगतो याच निवडणूकीत उपसरपंचपद गजूला दयावे असे विनायकला सांगतो. परंतु गजूला गणा लपवून ठेवतो. येसाजीला राजकारण हे बदमाश लोकांचे वाटते. सज्जनांचा त्यात टिकाव लागत नाही. येसाजीचे मत असते. तेच समाजाच्या उपयोगाचे आहे. राजकारणाने समाजाचे भले होईलच याचा भरवसा देता येत नाही. म्हणून येसानी प्रभूला म्हणतो.

"समाजकारण मनजे वारुळ उभं करणे...अन राजकारण मंजे वारुळाची नासधूस करणं... यातलं तुले जे पटते, करावं वाटते, तेच करत जाय..." (वारुळ पृ. क्र.४८४) खऱ्या अर्थाने गावच्या ग्रामपंचायतीमध्ये मातंगाच्या एका मताने विकास सरपंच होतो व मातंगाच्या असणाऱ्या मागण्या मान्य होतात.

५) **भगवान पाटील :—**

'वारुळ' मधील एक महत्वाची व्यक्तिरेखा वडगावची पाटील आहे. त्याचे आजोबा सिदाजी पाटीलांपासून त्यांच्या घरी गावची पाटीलकी होती. सिदाजी पाटील हे पैलवान होते. १० वर्षे सलग कुस्ती त्यांनी मारलेली होती. त्यांचा मुलगा देवबा पाटील हे भगवान पाटीलांचे वडिल मरण पावलेले होते. आपला जवान मुलगा डोळ्यासमोर मरण पावला याचे दु:ख सिदाजी पाटीलांना झाले. पाटील घराण्याचा येसाजीवर जीव होता. येसाजी गावकामदार येसकर असल्याने पाटीलांच्या सल्ल्यानेच कोणतेही गावातले काम करीत होता.

भगवान पाटीलांची बायको सुंद्राई पाटलीण बायजा व पारुला दळण कांडण सारवणे या घरकामासाठी बोलवायची सुंद्राईचा स्वभाव तापट होता. याऊलट पाटीलांचा स्वभाव सर्वांना सांभाळून घेणारा होता. त्यांना एकूण नव्वद एक्कर जमिन होती. त्यांच्यासारखा श्रीमंत मालदार गावात कोणीच नव्हता. सिदाजी पाटीलांचा जसा गावावर दबदबा होता तसा भगवान पाटीलांचा होता. गावातील न्यायनिवाडा पाटीलांच्या समोरच होत होता. बौध्द बौध्दधर्मात गेल्यानंतर त्यांच्यावर पाटीलांनी सात वर्षे बहिष्कार टाकला होता. दारुचा धंदा करणाऱ्या भिकाकडे सर्व मातंग लोकांना दुर्लक्ष करायला लावतात. भगवान पाटीलांना मातंगाच्या लोकांनी 'खुरमान' घालण्याची प्रथा होती. भगवान पाटील मोठया मनाचे होते. कुणाला कधीच त्यांनी दुखावले नव्हते. कोणाचाही कितीही अवघड प्रश्न ते सामोपचाराने सोडवितात. गावात मारामारी भांडणतंटा होऊच नये जसे त्यांना वाटे भगवान पाटील येसाजीच्या जागी प्रभूची कोतवाल पदाची ऑर्डर तहसलिदारांकडून घेतात. गावच्या पाटीलकीला महत्व कमी यायला लागले. याची जाणिव त्यांना आहे. यासाठी नवीन कायदे, समाज परिवर्तन कारणीभूत आहे हे त्यांना माहित आहे. गावात सरकारी अधिकारी किंवा कोणाही महारा–मांगाचा पाहुणा पाटीलांच्यात चहापाण्याला बोलावला जात होता. परंतु गावातले वातावरण बिघडत चालल्यामुळे नसत्या भानगडी उद्‌भवतील याची चिंता वाटते. पंचायतराज आल्यानंतर राजाराम बेलेला सरपंचपद त्यांनी दिले. रामा बेले पाटीलांच्या विरोधात जातो. गावातील भिका आणि बौध्दांना आपल्या बाजूला वळवितो. विनायक पाटील भगवान पाटीलांचा मुलगा याच्याकडे सरपंचपद आल्यानंतर बौध्दांना उपसरपंचपद आणि आंबेडकर पुतळा देतो. पुतळा कुठे बसवायचा यावर गावात वाद निर्माण होतो. हा वाद भगवान पाटील सामोपचाराने सोडविण्याचा प्रयत्न करतात. पोलीस स्टेशनला रिपोर्ट देतात. गावातील तीस लोकांना पकडून नेले जाते. त्यामध्ये लिंबा बेल्यासहित विनायकचाही समावेश असतो. त्यावेळी पालकमंत्री, खासदार स्थानिक आमदार, सभापती यांना भगवान पाटील मध्यस्थी करायला लावतात. त्यावेळी पोलीस फक्त विनायकला सोडायला तयार होतात. त्यावर पाटील म्हणतात.

"सोडत असाल तर सर्वांनाच सोडा; नाहीतर सर्वांनाच आत राहू दया"(वारुळ पृ. क्र.१८५) सर्वांना जामिन मिळावा यासाठी ते प्रयत्न करतात. सगळे जन सुटतात. त्यावेळी लिंबा बेले पाटीलांचे पाय धरतो.

साधना—गवनाला मारते त्याची केस देऊ नका. असे पाटील सर्वांना सांगतात. कारण की ती बायकांची भांडणे असतात. प्रभूला नेहमी स्वतःपुरते पाहण्यास पाटील सांगतात. भगवान पाटील पाटीलकीवरुन रिटायर्ड होतात. त्यावेळी पाटीलकींचा तात्पुरता चार्ज उमऱ्याच्या रामभाऊ पाटीलांकडे दिलेला असतो. पाटीलकीवर लिंबा बेले टपून बसलेले असतो. इंदीरा गांधींच्या खूनानंतर गावात दंगलीतून काही लोकांना पकडून नेले जाते. त्यांना पाटील सोडवून आणतात. तायडे गुरुजींच्या बदलीबाबत प्रभू पाटीलांना सांगतो तर त्याविषयी पाटीलांचे मत नकारार्थी असते. पाटीलांनी गावकीच्या पाटीलकीतून लक्ष काढले सर्व गावातले विनायकला भेटू, बोलू लागले. येसाजीला बघायला विनायक सोबत पाटील वाशिमला जातात. प्रभूला औषध—पाण्याची गैरसोय होऊ देऊ नका असे सांगतात. पैसा—अडका लागला तर मागा म्हणतात. आणि एका महाशिवरात्रीला त्यांचा मृत्यू होतो. पाटील म्हणून गावात सामोपचाराने राहणारी 'वारुळ' मधील व्यक्तिरेखा होती.

६) **भिका :—**

भिका हे येसाजी इतकेच या कादंबरीतले महत्त्वाचे पात्र आहे. मातंगाच्या पहिल्या पिढीतील हे पात्र गणाचा बाप आहे. येसाजी, हारजी, संपत, चहादू, नाथा, भीमा यांच्याबरोबर भिका गावकीची कामे करतो. त्यात सनई—चौघडा वाजविणे मर्तिकाचे निरोप देणे, ढोर—ओढणे सोलणे यासारख्या कामात भिका असायचा भिका—नाथाच्या पोंघाडयात सनई वाजवायचा, पोंघडा वाजवायचा नाथा उमऱ्याच्या सोनबा पाटलाच्या पोरीच्या लग्नाची सुपारी घेतो. भिकाही नाथाला न सांगताच परस्पर सोनाटीच्या जगन्नाथ पाटलाच्या पोरीच्या लग्नाची सुपारी घेतो. त्यामुळे नाथा—भिकाचा जोड सोडून जातो. येसाजी भिकाच्या जाग्यावर प्रभूला पोंघाडा वाजवायला पाठवितो. हे भिकाला आवडत नाही. भिकाला येसाजी

आपल्या विरोधात काम करतो असे नेहमी वाटत राहते. म्हणून तो येसाजीच्या कोणत्याही कामात नेहमी आडकाठी येतो.

भिकाजी बायको द्वारका हिला एकूण पाच मुले होती. त्यापैकी गणा हा थोरला होता. भिकाजी मुले लहान असताना एक दिवस रामचंद्र दुकानदाराच्या खळयावर रात्री काम करीत असताना त्याला बायकोची आठवण येते. मालकाला सांगून खळयावरुन तो घरी येतो. बायको जागीच असते. दार उघडून आत येतो. तर त्याची सासू त्यादिवशी आलेली असते तिला बघून तो चपापतो मनात म्हणतो. 'ही कशाला आली? मध्ये बिब्या घालायला.' आल्यापावली तसाच तो खळयावर कामाला जातो.

विश्वास बेल्याची गाय मेल्यानंतर सर्व मातंग ओढायला जातात. गायला भिका ओढू देत नाही, कारण गावकीच्या कामच्या केलेल्या वाटण्या त्याला पसंत नसतात. येसाजी पोलीस स्टेशनला आठवडयाचा अनसिंगला रिपोर्ट देतो. अर्थात येसकरकीचे येसाजीचे काम भिकाला आवडत नाही. हात न मळवता येसाजी नुसता पडीचा हिस्सा नेतो हे भिकाला पटत नाही. येसाजीनेही ढोरं ओढावी—सोलावी, येसकरकी मागावी दवंडी दयावी मर्तिकाचे निरोप दयावे. असे भिकाला वाटते गाय ओढू देत नाही याचे कारण येसाजीवर भिकाचा राग असतो. सोनाटीच्या जगन्नाथ पाटलाच्या पोरीच्या लग्नात सनई—चौघडां वाजविला नाही म्हणून भिकाला त्याने मारले त्याचा राग भिका येसाजीवर काढतो. जगन्नाथ पाटलाला येसाजीनेच आपल्याला मारायला लावले असा भिकाला संशय येतो. एकूणच भिकाचे घराणेच बेईमानी, लबाड, आडमुठे होते. भिकाच्या बापाने बुगाची बेल्याचा मार खाल्ला होता. तर आज्ज्याने अर्ध्या गावाचा मार खाल्ला होता. भगवान पाटलांशी भिका सरळ बोलत नाही भिका पडीचा हिस्सा येसाजीला देऊ देत नाही. भिका आळशी, कोणतेही काम मन लावून न करणारा, सामूहिक कामात अडथळा निर्माण करणारा होता. गावकीची कामे सोडून तो दारुचा धंदा करतो. मोहफुलं जमा करुन उमऱ्याला नेणे, दारु काढणे, ती विकणे असा भिकाचा दिनक्रम ठरलेला होता. एक दिवस दारुच्या बाटल्या घरात सापडल्यामुळे त्याला पोलीसांनी बेदम मारले होते. तरीही सुटून येऊन त्याने राजरोसपणे दारुचा धंदा

केला. भगवान पाटीलांना याविषयी माहिती असूनही सर्वांना त्याकडे दुर्लक्ष करायला लावतात. दारुच्या पैशातून भिका गणाला बँड घेऊन देतो. गणाला येसाजी—प्रभू यांच्या विरोधात सारखा भडकवितो. नाथाच्या सनई—चौघडयाच्या जोडातून त्याला बाहेर टाकले म्हणून गणाला बँड घेऊन देवून प्रभू—नाथाचा सनई—चौघडयाचा जाडे त्याला बंद पाडायला भिका सांगतो. प्रभूला लग्नाच्या सुपाऱ्या मिळू नये यासाठी गणा स्वत:च्या बँड बरोबर अनसिंगचा बँड ही लोकांना लग्नात लावायला सांगतो. भिका रामा बेल्याच्या बाजूला जातो. आणि भगवान पाटील, मातंगवाडयाला त्रास दयायला लागतो.

भिकाचा सर्वात लहान मुलगा बाजीरावची बायको मीरा हिचे राजाराम मास्तरशी अनैतिक संबंध होते. हे सर्व गावाला माहित असते. लोक या बाबतीत भिका—द्वारकाला येवून सांगतात परंतु दोघेही वयाने म्हातारे झाल्यामुळे त्यांचे कोणीही मुले ऐकत नाहीत. भिका मीराला रागाने बोलतो. "तुझ्या मायनं तव्हं नाव मीरा ठेवलं. तं तिले काय तुहं पुढचं भविष्य आदुगरच कळलं व्हतं का काय? नवऱ्यावर ध्यान नाही अन परक्याचं पाने लावी. हे धंदे सोडून दे हे आपल्याले हे शोभत नाहीत." (वारुळ पृ. क्र.४४२)

भिका हे पात्र यामध्ये खल प्रवृत्तीचे लेखकाने दाखविलेले आहे. भिका येसाजीला कोणत्याही कामात अडथळे आणतो तर त्याचाच मुलगा गणा येसाजीच्या पोराला प्रभूला कोणत्याही समाजकार्यात अडथळा आणतो.

**७) यादव :—**

ही एक येसाजीबरोबरची मातंगाच्या पिढीतली एक व्यक्तिरेखा आहे. गावकीची कामे करीत—करीत आपला जीवनक्रम चालवित असताना हरिपाठाच्या भजनी मंडळात यादवचा भगवान पाटीलांच्या मदतीने प्रवेश होतो. त्याला कारण भजनी मंडळाचा पखवाज वाजविणारा रामा धनगर सर्प दंश होऊन मरण पावतो. त्यामुळे पखवाज वाजविण्यासाठी भगवान पाटील कुणब्या — तेल्या धनगरांच्या भजनी मंडळाला यादव हा मांगाचा माणूस सुचवितात. पण मांगाचा माणूस पखवाज कुणब्यांच्या भजनात वाजविणार ही गोष्ट कोणालाच पटत नव्हती. भजनी

मंडळाचा हरिपाठ मारुतीच्या पारावर चालत होता. मारुतीच्या पारावर मांगाचा यादव पखवाज वाजविणार कसा? असा प्रश्न उत्तम बेल्या उपस्थित करतो. त्यावर मारुतीच्या पायरीजवळ उभा राहून त्याला पखवाज वाजवायला सांगतात. पावसाळयात मात्र त्याच पायरीजवळ त्याला एखादी लहानशी झोपडी बांधायचे ठरवितात. पखवाज वाजविण्याची हातमोडी झालेल्या भजनी मंडळात यादवला पखवाज वाजविण्याची हातमोडी झालेल्या भजनी मंडळात यादवला प्रवेश देतात.

थंडी—तापाने आजारी असल्यामुळेच यादव एक दिवस तो हरिपाठाला जावू शकत नाही. कौशल्या त्याची बायको त्याला पाठवित नाही. यादवाला मात्र आपण गेलो नाही तर हरिपाठ बंद पडेल. अशी चिंता वाटते. तो घरातच हरिपाठाला सुरुवात करतो. बसल्या जागीच हरिपाठ म्हणण्यात गुंग होतो. कौशल्याला हे पाहून बरे वाटते. त्याला आपण हरिपाठाला जाऊ दयायला पाहिजे होते. असे तिच्या मनात येते. यादवच्या हरिपाठामुळे देवच घरात अवतरला असे तिला जाणवते. हरिपाठाविषची गोडी तिच्यात निर्माण होते. हरिपाठामुळे कौशल्या त्याचा राग करायची ही तिची चूक तिच्या लक्षात येते. हरिपाठ, विठ्ठलाची आरती, नंतर आरतीचा उपसंहार म्हणून यादव स्वत:भोवती गिरकी घेतो. कौशल्याला हे बघून यादवचा हरिपाठाचे, उत्साहाचे नवल वाटते. यादव आजारी आहे. असे एखादयाला सांगितले तरी त्यावर कोणाचा विश्वास बसला नसता. एवढा हरिपाठाला यादव उत्साह होता. कौशल्या तर आश्चर्य चकित होते. हरिपाठा अगोदर रामकिसन मानदाराचा बैल मेल्याची बातमी घेऊन हारजी यादव घेऊन जाण्यास येतो पण आजारपणामुळे त्याला जाता येत नाही.

यादवचा हरिपाठ होतो का नाही तर भगवान पाटीलांचा गडी दारात येवून सिदाजी पाटील मेल्याचे सांगतो. आणि यादवला आजारी अंगाने पाटलांच्या नातेवाईकांना निरोप देण्यासाठी गावोगावी जावे लागते. कौशल्याच्या डोळयातून पाणी येते. यादवचे तिला वाईट वाटते. आपल्या मातंगाच्य जीवनाचा तिला राग येतो. त्यावर तिची यादव समजूत घालतो. पाटलाच्या मृत्यूमुळं आपल्या पंधरा दिवस चुली पेटणार नाहीत. कारण सावडणं, दसवं, तेरवं यात पाटलांच्या घरचे काम करुन त्यांच्याच घरी त्यांना जेवावं लागणार होते. सिध्दाजी पाटलांच्या प्रेतावर

उधळलेले जास्तीत जास्त पैसे आपल्याला भेटावेत त्यामुळे पोरांना बाहेर कुठे जाऊ देऊ नकोस असे सांगून मर्तिकाचा निरोप दयायला यादव कवठयाला निघून जातो. येसाजीच्या पिढीतल्या यादवला दोन मुली एक सगुणा, लहान रंभू होत्या. तर एक भागवत नावाचा मुलगा वेडसर होता. सात वर्षे कसातरी जगला आणि तो मरण पावला. यादवने मुलासाठी दुसरी बायको करावी अशी कौशल्या त्याला सल्ला दयायची पण त्याने दुसरे लग्न केले नाही. यादव मृत्यू पावतो. त्यानंतर प्रभू कौशल्याला संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवून देणे.

**८) अण्णासाहेब भोपळे :—**

ही व्यक्तिरेखा कादंबरीत अल्पसीच आहे. तरीपण या व्यक्तिरेखेचे महत्त्व परिवर्तनवादी चळवळीच्या दृष्टीने कादंबरीत अनन्यसाधारण आहे.

डॉ. भोपळेंनी मुंबईला वेगवेगळया झोपडपट्टयात राहणाऱ्या मातंग समाजाची एकजूट घडवून आणली १७ जानेवारी १९८२ ला. 'अखिल महाराष्ट्र मातंग संघ' ची स्थापना केली. मोहना या गावी शपथ घेतली. "जगेन तर समाजासाठी,मरेन तर समाजासाठी." १९ (वारुळ पृ. क्र.१९३) मुंबईतील झोपडपट्ट्यातील मातंग समाजाच्या समस्या त्यांनी सरकार दरबारी सोडविल्या. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी त्यांचा लढा चालू होता. महामंडळा करवी मातंग लोकांना छोटा—मोठा उदयोग करण्यासाठी कर्ज मिळणार असते. आणि अतिक्रमित पडीक जमीनी मातंगांना मिळाव्यात अशी या महामंडळाची मागणी असते. डॉ. भोपळे साहेब पेशाने डॉक्टर आहेत. औषधोपचारासाठी येणारे लोक आपल्या अडचणी त्यांना सांगत. अडचणी या ऑफिससंदर्भात सरकारी असत. स्वत:चा वेळ खर्च करुन त्या सोडविण्याचा प्रयत्न भोपळे साहेब करीत. मातंग समाजाच्या अज्ञान, अंधश्रध्दा गरीबी या समस्याची जाणीव भोपळेंना होती. सर्व मातंग समाजाला एकत्र करुन मुंबईत रामनगर भागात शिवाच्या रुपात मातंग. ऋषीची स्थापना केली. व १९८२ ला महाशिवरात्रीला यात्रा भरविली. मुंबईला 'अखिल महाराष्ट्र मातंग संघ' नावाने परिवर्तनवादी चळवळ सुरु केली. तिच्या शाखा जिल्हा, तालुका व गावपातळीवर स्थापन होऊ लागल्या. मातंग समाजात

बौध्द समाजासारख्या शैक्षणिक, सामाजिक, राजकिय दृष्टया परिवर्तन व्हायला लागले. विदर्भात वाशिम, अनसिंगमध्ये मातंग संघाच्या शाखा स्थापन होतात. नंतर गावपातळीवर शाखा निर्माण होऊन चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागातल्या मातंगाचा विकास साधला जातो. वाशिमला तालुका कार्यकारणीद्वारे संघटनेचे कार्यक्रम होतात. गाव, तालुका जिल्हा पातळीवरचे संघटनेचे सर्व सदस्य उपस्थित राहतात. भोपळे आंबेडकरांनी दलितांना जो मार्ग दाखविला त्या मार्गानीच जातात डॉ. आंबेडकरांनी केलेलेच समाजहिताचे कार्य करतात सर्व मातंग लोकांतून डॉ. भोपळेंच्या कार्यक्रमाची मागणी असते. तो कार्यक्रम ६ डिसेंबर १९८४ ला असतो. त्या कार्यक्रमाला मातंग समाजातील कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभते. उपोषण, सभा, शिष्ठमंडळे घेऊन मंत्री, यांच्या भेटी घेतल्या भोपळेंनी समाजात जागृती निर्माण केली. मातंग लोकांना रोजगार मिळवून दिला. त्यामुळे भोपळेंना लोक देव समजत त्यामुळे भोपळे साहेबांच्या कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित होतात. कार्यक्रमावेळी स्वत:भाषणात भोपळे मातंगांची दयनियता, दुबळेपणा, अन्याय, आत्याचार यावषियीच्या जीवनाचे चित्र उभे करतात. लहुजी साळवे, अण्णाभाऊ साठे यांच्या जयंत्या नेहमी साजऱ्या कराव्यात असे भोपळे आपल्या मातंग बांधवाना सांगतात. शिक्षण घ्या, नवनव्या गोष्टींचा स्वीकार करा. मेलेलं ढोर ओढू नका, कातडे सोलू नका, फुकट डफडे वाजवू नका. गावकीची कोणत्याच प्रकारची हलकी सलकी कामे करु नका. असा मातंगाना उपदेश करतात. भोपळे साहेबांच्या सहवासात राहूनच प्रा. अंभोरें सारखे कार्यकर्ते चळवळीत आक्रमक होतात. कारण आक्रमकता चळवळीस योग्य ठरते. शामराव थोरातांच्या जाळीत प्रकरणात भोपळे मुख्यमंत्र्याची भेठ घेतात. व मुख्यमंत्र्यांना त्यावर योग्य कारवाई करण्यास सांगतात. शामराव थोरातासह जळीत प्रकरणातील सर्व मातंग लोकांना सरकारी मदत मिळते.

डॉ. भोपळे शिवसेनेत प्रवेश करतात त्या प्रवेशा मागची त्यांची भूमिका वेगळी होती. समाजकारणाला राजकारण फायदेशिर ठरते असे त्यांचे मत असते. परंतु चळवळीतले कार्यकर्ते त्यांच्यावर नाराज होतात. प्रा. अंभोरे तर अ.म. संघातून बाहेर पडतात, संघात फुट पडते. अंभोरे 'अण्णाभाऊ साठे आघाडी' स्थापन करतात.

### ९) तायडे मास्तर :—

तायडे मास्तरांचे संपूर्ण नाव गजानन उकंडा तायडे. हे मातंग समाजाचे. मॅट्रीक शिकून त्यांनी डी. एड. चे ट्रेनिंग घेतले. प्राथमिक शाळेत शिक्षक झाले. वडगावच्या शाळेत आल्यानंतर हेडमास्तर गावंडे प्रभूला बोलवून तायडे मास्तरांची ओळख करुन देतात. मांगवाडयात मास्तरांना खोली शोधून देण्यास सांगतात. अनसिंगहून त्यांना गाडीने येवून जाऊन करता आले पण मास्तरांची इच्छा वडगावातच मातंगसमाजात राहाण्याची होती. मातंगाची सर्व घरे लहान टीनाची त्यामुळे प्रभूला मास्तरांना खोली बघण्याचा प्रश्नच पडतो त्यावर मास्तर खोली साधी असली तरी चालेल असे सांगतात. मास्तरांना मातंग समाजाच्या परिस्थितीची जाणीव आहे. त्याचा जन्मही सर्वसामान्य मातंग समाजात झालेला असतो. तरी मास्तरांची एक अट असते. खोली आपल्याच वस्तीत आणि शेजारी — पाजारी माणसं माणुसकीची चांगली असावीत. प्रभू मास्तरांना अनसिंगला रुम घेऊन रहायला सांगतात, त्यावर उत्तर देतात "नाही ते मला पसंद नाही. मला आपल्या जातीच्या लोकांच्या संगतीत रहायला आवडते, म्हणून याच गावात तेही आपल्या वस्तीत (वारुळ पृ. १८०)खोली मिळावी हा माझा आग्रह आहे." (वारुळ पृ. १८०) प्रभू मास्तरांना खोली बघायला निघतो. मास्तरांना विषयी कौतुक वाटते. प्रभू त्यानां खोली पाहू शकत नाही, अचानक पारु, संतोषकडून प्रभूला समजते की मास्तर बँडवाल्या गणाच्या खालीत रहायला आलेत. प्रभूला वाटते मास्तर गणाच्या खालीत रहिल्याने वाया जातील. प्रभूच्या घरी त्यांचे जाणे—येणे चालू असते. प्रभूजवळ बौध्दांच्या पुतळा प्रकरणी चौकशी करतात. बौध्द समाजाची एकजूट प्रभूला सांगतात 'बौध्दांसारखी एकजूट कूणब्यात नसते. तायडे म्हणतात बौध्दसारख्या एकजूटीने राहणारा समाज मी अजून पाहिलेला नाही. त्याचे पुढारीही त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत नाहीत. अन्याय झालेल्या समाज बांधवांना वाऱ्यावर सोडीत नाहीत. अशा प्रकारची चर्चा तायडे गुरुजी प्रभू जवळ करतात. बौध्द शिका संघतीत व्हा, संघर्ष करा,हे तत्त्व तंतोतंत पाळतात.कुणब्याच्या बहिष्काराला ते भित नाहित.जगण्यासाठी कुणब्यांवर अवलंबून नाहीत.गावात पोट भरत नसेल तर बौध्द

खुशाल गाव सोडतात. कोठेही काम करतात. गाववालेच त्याच्यावाचून अडतात. त्यामुळे वडगावाच्या पुतळा प्रकरण गाववाले आणि बौध्द यांचा शेवटही अशाच प्रकारे होईल असे तायडे गुरुजींना वाटते. बौध्द सांगतील त्याठिकाणीच गाववाल्यांना पुतळा उभा करु दयावा लागेल. गाववाल्यांच्या मिटींगाचा त्यांच्यावर काहीच परिणाम होणार नाही. कुणबी समाज एकमेकांचे पाय ओढतो हेवेदावे करतो.

बौध्दांजवळ पैसा जर असता तर त्यानी सूर्याला पश्चिमेकडून उगवायला भाग पाडले असते ही सगळी एकजूट आंबेडकरांनी निर्माण केली. आपल्याही समाजात आंबेडकरसारखा नेता जन्माला येईल अशी तायडे मास्तर आशा बाळगतात. कुणब्यातील सरपंच,पाटील,सदस्य हे बौध्दांची मनधरणी कुणब्याना करायला लागते. गाववाल्यांच्या विरोधात मातंगाची एक व्यक्ती उभी रहाते आहे, असे प्रभूला मास्तर सांगतात. तिचे नाव डॉ. अण्णासाहेब भोपळे या व्यक्तिने 'अ. म. मातंग' संघाची मुंबईला स्थापना केली. सर्व मातंग समाजाला संघटीत केले. त्यांच्या विकासासाठी 'लो. अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ' मागून घेतले. या सर्व गोष्टींची ओळख या कादंबरीतील नायकाला तायडे मास्तर करुन देतात.

अण्णाभाऊ साठे यांची मातंग समाजाला ओळख नाही. पुराणकाळातील मातंग ऋषींपासून मातंग समाजाची निर्मिती झाली हे तायडे गुरुजीच प्रभूला सांगतात. विकास महामंडळातर्फे उदयोग व्यवसायाला मातंगांना कर्ज मिळते. अतिक्रमित मातंग समाजाची जमिन त्यांनाच भाडेपट्टीने मिळावी यासाठी विकासमहामंडळ प्रयत्नशील आहे. डॉ. भोपळे परिवर्तनवादी चळवळ, विकास महामंडळ तायडे मास्तरांना त्यांच्या भावामुळे समजतात. भोपळे साहेबाबरोबरच तो मुंबईला असतो. तो तायडे मास्तरांच्या सांगण्यावरुन गावोगावच्या मातंग समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करतो. मातंग समाजाला कोणत्या योजनांचा लाभ होतो, तालुक्यात किती मातंग मतदार संघ आहेत, कोणकोणत्या कार्यलयात मातंग लोक कोणकोणत्या पदावर कार्यरत आहेत, या गोष्टी अभ्यासाने जाणून घेण्याचा प्रयत्न तायडे मास्तरांचा असतो. मांतगांवर होणाऱ्या अन्यायाबद्दल विविध सामाजिक, राजकिय हक्कांबद्दल, जाणिव–जागृती करण्याचे तायडे मास्तर

ठरवितात. प्रभूकडे त्यासाठी सहकार्याची मदत मागतात. वडगावात मॅट्रीक पर्यंत शिकलेली एकही व्यक्ती नाही याचे मास्तरांना वाईट वाटते. मुले साधी मराठी शाळेतही येत नाहीत. शाळा मध्येच सोडतात. मुलींचे शाळेतील प्रमाण अल्प यावर ते लक्ष देतात. भविष्यकाळासाठी शिक्षण आवश्यक आहे असे ते सांगतात. आंबेडकरांचा शिक्षणाविषयी मंत्र मातंगानी आचरणात आणावा. शिक्षणाने माणसात स्वाभिमानाने माणूस गुलाम राहात नाही. शिकला सवरला तर आपला समाज कुणब्यांच्या जोखडातून मुक्त होईल असा आशावाद मास्तर व्यक्त करतात.

साधना—गवना भांडणात मास्तरांचे पक्के लक्ष असते. साधना ही राजाराम मास्तरची बायको मातंगांच्या गवनीला मारते. त्यात गवना अनसिंगला दवाखान्यात ॲडमिट असते. गवनाला न्याय मिळवून देण्याचा मास्तरांचा प्रयत्न असतो. गवनाला मारुन मातंग लोक एवढे शांत कसे? असा प्रश्न मास्तरांना पडतो. तायडे मास्तरांना वाटते की आपण या संदर्भात पोलिसात तक्रार नोंदवायची? की आपल्या डॉ. भोपळे सोबत काम करणाऱ्या भावाला बोलवावे. हया सर्व गोष्टी त्यांना नोकरी साभांळून कराव्या लागत होत्या. येसाजीची चौकशी करुन वडगावातला गातंग समाज गणा, भिका, कुणबी यांची माहिती मिळवितात. ऑपरेशनच्या केसला दिलेले २००रु. यंका राजारामला परत देतो. तायडे गुरुजींना समजते कायदयाचे संरक्षण आपल्या जमातील असताना हे पैसे दयायला नको होते असे वाटते. मास्तरांना त्याविषयी राग येतो. समाजाच्या हिताच्या कामाला इतर लोकांना मास्तर भानगड करतात असे वाटते. तायडे मास्तरांना वाटते. बौध्दांसारखा मातंग समाजाचा गावावर वचक असायला पाहिजे. मास्तर शाळेच्या वेळात शाळा आणि उरलेल्या वेळात समाजाविषयी माहिती मिळवितात. याचे प्रभूसहित येसाजीला आश्चर्य वाटते.

मांगवाडयात मास्तर चांगले रमलेले होते. झोपडपट्टीतल्या सर्व मातंग लोकांना ते चहाचे निमंत्रण देतात. स्वत:च्या अंगणात अण्णाभाऊ साठे यांचा फोटो पुजून त्यांची जयंती साजरी करतात. मास्तरांविषयी प्रत्येकाला आदर होता. प्रत्येकाला ते दादा, बाबा, आई, ताई म्हणून बोलत होते. जयंती वेळी प्रभूला ओटयावर गणांशेजारी बसायला बोलावतात त्यावेळी गणाला सहन होत नाही.

गणाला मास्तरांचा राग येतो. प्रभू नमती बाजू घेवून अण्णाभाऊ साठे जयंतीचा कार्यक्रम सुरळीत पार पाडावा यासाठी मदत करतो. मास्तर अण्णाभाऊ साठेंची सर्वांना ओळख करुन देतात. दलितांचे जीवन अण्णाभाऊंनी आपल्या कथा, कादंबऱ्यातून कसे मांडले, त्यांच्या पुस्तकांवर सिनेमे कसे निघाले? सरकारी पारितोषिके त्यांच्या पुस्तकांना कशी मिळालीत याचा आढावा मास्तर घेतात आणि अण्णाभाऊचे लेखन जागतिक कीर्तिचे कसे झाले हे जातीबांधवांना सांगतात. याच कार्यक्रमात मुंबई प्रदेशला सुरु झालेल्या अ.म.मातंग संघांच्या रुपाने परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ कसे मिळविले याविषयी माहिती देतात. आपल्या हक्क, मागण्यांसाठी हे महामंडळ उपोषण, मोर्चे, मेळावे इ. मार्गांनी सरकारवर दडपण आणून आपल्या मागण्या पूर्ण करुन घेते. अ. म. मातंग संघाचे संस्थापक डॉ. अण्णासाहेब भोपळे त्यांचे कार्य कर्तृत्व, डॉक्टरी पेशा त्यांना दिसलेले मातंग समाजाचे दु:ख व त्यासाठी उभी केलेली परिवर्तनवादी चळवळ मातंगांना स्वावलंबन, स्वाभिमान, स्वातंत्र्य, संघटन इ. गोष्टी शिकवितात. तायडे मास्तरांच्या भाषणाने सर्व मातंग भारावून जातात. गणा मास्तरांना सारखा विरोध करतो. त्याची समजूत घालतात. गणा मास्तरांची तक्रार गावातल्या लोकांजवळ करतो लिंबा बेल्यांच्या मदतीने सभापतीजवळ तक्रार देवून त्यांची बदली करायला लावतो. अण्णाभाऊ साठे जयंती निमित्ताने गणा प्रभू यांच्यातील भेद कमी करण्याचा प्रयत्न असफल ठरतो. या प्रयत्नाला राजकीय स्वरुप देण्याचा प्रयत्न असतो. त्याचा राग मास्तरांना येतो. जयंतीच्या निमित्ताने अण्णाभाऊंच्या पुस्तकाच्या वाचनाची गोडी मास्तर लोकांमध्ये निर्माण करतात. पुस्तके लोकांना अकोल्याहून आणून देतात. त्यासाठी स्वत:पैशाची झळ सहन करतात. समाजासाठी कार्य करीत असताना इतर मास्तर तायडेना वेडेवाकडे सल्ले देत. तालुका पातळीवर कार्यक्रम राबविण्याची राठोड गुरुजींची कल्पना त्यांना पसंद पडते. प्रभू, तायडे मास्तर गणाला वठणीवर आणण्यासाठी अ.म.मातंग संघ वडगाव शाखेचे अध्यक्षपद साठेंसाहेबांच्या मदतीने गणाला देतात. त्यामुळे गणाही समाज कार्यात सहभागी होतो. वाशिमच्या कार्यक्रमाला गणा सर्वात पुढे असतो. वर्गणी जमा करतो. स्वत:चे नाव हँडविलात सर्वांना दाखवितो.

पाणी पाडया महाराजाला जणा व तायंडे मास्तर कुणब्यांच्या तावडीतून सोडवितात पाणी पाडया महाराज हा मातंग समाजाचा असतो त्याला सोडविणे हे आपले कर्तव्य आहे असे मास्तर सांगतात. दिवाळीचा सुट्टी लागूनही मास्तर घरी जात नाहीत. मातंग समाजाचा अंधार दूर करण्यासाठी वाशिमच्या कार्यक्रमासाठी ते थांबतात. तायडे गुरुजी प्रभूला मदत करतात म्हणून कुणबी पाटलाघरी मिटींग घेतात. व बदली करतात. कार्यकारणीत प्रभूला घेत नाहीत याचे मास्तरांना दुःख होते. कायम अण्णाभाऊची जयंती साजरी करण्यासाठी प्रोत्साहीत करतात. राजू खंदारे कडून पुस्तके आणून देतात. रविवारी स्वतः ग्रंथालयात भरतात. नावडीचे बोरकर गुरुजी बदलीची ऑर्डर निघाल्याचे मास्तरांना सांगतात मास्तरां विरुध्द तक्रार अर्जात 'जातीय दंगली मास्तर वाढवितात अशा प्रकारचा आरोप केलेला होता. तक्रार अर्जावर ग्रमास्थांबरोबर विनायक, लिंबा बेले आणि गणाचाही समावेश होतो. याचे मास्तारांना आश्चर्य वाटते. प्रभू मास्तरांना ऑर्डर घेवू देत नाही. बदलीने चळवळीचे नुकसान होते. त्यामुळे मुलांना अण्णाभाऊंची पुस्तके वाचायला मिळणार नाहीत. याचे मास्तरांना वाईट वाटते. त्यात गणाला अध्यक्ष केले याचा त्यांना पश्चाताप होतो. गणा वाईट मार्गाने गेल्यास त्याला योग्य मार्ग दाखविण्यास मास्तर प्रभूला सांगतात. मास्तरांचे मनही वडगावात उदासपणे झालेले असते.

**१०) सूर्यकांत साठे :—**

साठे हे अ. म. मातंग संघ वाशिम शाखेचे अध्यक्ष आहेत ते सोनाळयाचे मातंग समाजाच्या परिवर्तनवादी चळवळीचा महत्वाचा कार्यकर्ता म्हणून साठेंना ओळखले जाते मातंग लोकांची कोणतीही कार्यालयीन कामे करीत त्यामुळे ते कोर्टावरच कायम असायचे. वाशिममध्ये राहून आपल्या संघटनांचे कामकाज गावागावच्या शाखांचे कामकाज ते लक्षपूर्वक करीत आहेत. साधना—गवना हे वडगावचे भांडण त्यांना माहित होते. प्रभूला साठेंची ओळख तायडे गुरुजींमुळे होते. प्रभूला त्रास देणारा गणा याला तायडे गुरुजी आणि साठे यांनी अ. म. मातंग संघ वडगावचे अध्यक्षपद दिले. कारण गणाला सरळ करण्याचा एकमेव मार्ग साठे साहेबांनी अवलंबलेला होता.

वाशिमला अ. म. मातंग संघाचा डॉ. भोपळे साहेबांच्या उपस्थितीत कार्यक्रम घ्यायचा होता. तयाची गावागावच्या कार्यकारणी तयार करायच्या होत्या. साठे साहेब वडगावची कार्यकारणी प्रभूच्या मदतीनेच ठरवितात. यावर गणाला राग येतो. कार्यकारणीत प्रभूला घेतले नाही. याचा आनंद गणाला होतो. मात्र साठे प्रभूला कार्यकारणीत सल्लागार पदावर ठेवतात.

गणा अध्यक्ष झाल्यावर साठे गणाला अन्यायाविरुध्द लढायला सांगतात गटबाजी नको, एकोपा हवा. यासाठी चळवळीचे काम करताना आपल्याला अडथळा आल्यास तालुका कार्यकारणी आहे, असे सांगतात. चळवळीचे नुकसान एखादया सदस्याकडून झाले तर कार्यकारणी रद्द करण्याचा अधिकार साठे आपल्याकडे ठेवतात. वाशिमला कार्यकारणी ठरवायला आलेल्या सर्वांना इंदिरा गांधींच्या खूनाची बातमी सांगतात. साठे डॉ. भोपळेंचे कार्य तालुक्यात व गावोगावी जाऊन करीत असत. मुंबईला भोपळेंची गाठ घेवून वाशिमच्या कार्यक्रमाचे निमंत्रण स्वत:देतात त्यावेळी भोपळे वासिमच्या कार्यक्रमाची तारीख साठेंना देतात. कार्यक्रमाला येणारा खर्च प्रत्येक गावच्या कार्यकारणीने अध्यक्षांच्या जवळ जमा करावा असे साठेंच ठरवितात.

येसाजीलाही साठेंच कर्तृत्व, मोठेपण समजले होते. त्यामुळे तायडे मास्तरांची बदली ऑर्डर रद्द करण्यासाठी येसाजी प्रभूला साठेंचे नाव सुचवितो पाणीपाडया महाराजाला वाचविल्यामुळे वाशिममध्ये साठे गणाचा सत्कार घेतात. संभा बेल्याचा मेलेला बैल ओढीत नाही. म्हणून लिंबा व राजाराम यंकाला मारतात त्यावर तालुका कार्यकारणी दखल घेत नाही म्हणून प्रभू सल्लागार पदाचा राजीनामा साठेसाहेबांना देतो साठे तो नाकारतात व प्रभूला घरी भेटायला येतात. खंडाळयाचा शामराव थोरातांवर सवर्णांकडून झालेल्या अन्यायाला न्याय मिळवून देण्यासाठी साठे मंत्री, सरकारी अधिकारी, यांच्यापर्यंत जातात व सरकारकडून शामराव थोराताला आर्थिक मदत मिळवून देतात. त्यासोबत सर्व मातंगांना विशेष सवलती मिळाव्यात यासाठी एक लेखी निवेदन साठे मंत्र्यांना देतात. विकास मंडळातर्फे साठे मातंग लोकांना छोटया मोठया उदयोग व्यवसायासाठी कर्ज मिळवून देतात. त्यासाठी स्वत:च्या खिशाला झळ बसली तरी लोकांची कामे

लवकर व्हावीत असा त्यांचा निश्चय असतो. चळवळीतील अकार्यक्षम लोकांच्याकडे दुर्लक्ष करायला सांगतात.

डॉ. भोपळे शिवसेनेत प्रवेश करणार या बातमीने साठे साहेबांना चळवळीची चिंता वाटते. पण साठेंना वाटते की कोणतीही चळवळ अखेर राजकीय रुप धारण करते. समाजाचे प्रश्न त्यामुळे सरकारपर्यंत पोचतात, ते सोडविण्याचा प्रयत्न सरकारी यंत्रणे मार्फत केला जातो. डॉ. भोपळे विषयी प्रा. आंभोरे नकारार्थी बोलतात. साठेंना ते आवडत नाही. प्रा. आंभोरे अ. म. मातंग संघातून बाहेर पडणार हेही साठेंना अगोदरच माहित होते. आंभोरेंनी भोपळेंना अवतारी पुरुष मानले हे साठेंना गलत वाटते. म्हणून साठेंनी प्रा. अंभोऱ्यांना अडाणी माणसात जमा केले होते. डॉ. भोपळेंनी शिवसेनेत प्रवेश केला हे आंभोऱ्यांना आवडत नाही. त्यांच्या शिवसेना प्रवेशाचे समर्थन देताना "कोणतंही वयात आलेलं आंदोलन शेवटी राजकिय स्वरुप घेतल्याशिवाय राहात नाही" (वारुळ पृ. क्र.४२३) म्हणतात. साठेंना भोपळेंचा राजकारण प्रवेश संघटनेला स्वतःची ताकद सिध्द करण्याची संधी वाटते चळवळीने राजकारणाची कास धरली तर फायदाच होतो असे साठेंचे मत असते. आभोरे चळवळीतून बाहेर पडल्यावर सरचिटणीसपदी साठे प्रभूची नेमणूक करतात कोर्टकचेरीची कामे केली की लोक चहापानासाठी पैसे देतात. ते स्वतःसाठी न घेतात संघटनेसाठी पावती फाडून जमा करण्याची नवीन योजना साठे राबवितात निराधारांना आवश्यक माहिती देण्याचे काम साठे करतात.

## २.२) गौण व्यक्तिरेखा :—

कथानकाच्या आशयाचा आविष्कार करण्यासाठी मुख्यव्यक्तिरेखेच्या बरोबर प्रसंगानुसार ज्या व्यक्तिरेखा येतात त्याला गौण व्यक्तिरेखा म्हणतात. छोटया—मोठया प्रसंगातून या व्याक्तिरेखा कथानक पुढे सरकवत असतात. 'वारुळ' मधील गौण व्यक्तिरेखा.

१) पारु :—

'वारुळ' कादंबरीचा नायक प्रभू गायकवाड याची पारु बायको बायजाचा भाऊ दयारामची मुलगी. पारु दयाराम बायजाच्या पाठीमागे प्रभूला पारु देण्यासाठी लागला. त्यावर लग्न करताना पारुलाच करु असे बायजा सांगते. त्यावेळी दयाराम शांत झाला. १९ एप्रिल १९६२ ला प्रभू आणि पारु याचे लग्न होते. लग्नावेळी पारुचे वय अवघे १० वर्षाचे होते. त्यामुळे बायजा पारुला माहेरातच कवठयाला राहण्यास सांगते. दयाराम मात्र त्याला नकार देतो. लग्नानंतर बायजाबरोबर पारु गावात कुणब्यांच्या घरी मजुरीला, दळणकांडण, सारवण करायला जाते. ग्रहण मागण्याचा मातंगाचा अधिकार असतो बायजा बरोबर पारुही गावात ग्रहण मागायला जाते. पारु प्रभूला ग्रहणाचे दान मागायला का आला नाही. म्हणून विचारते प्रभू काहीच उत्तर देत नाही. कोतवालपदासाठी पाटील व येसाजी प्रभूचे नाव सुचवितात. त्यावेळी पारुला आनंद होतो. पारुला १४ एप्रिल १९७० ला पुत्ररत्न होते. त्याचे नाव संतोष असे ठेवले होते.

येसाजी वाशिमच्या दवाखान्यात ॲडमिट होता. तेव्हा पारु त्याच्याजवळ राहाते. दवाखान्यात ज्योती नर्स येसाजीसाठी धडपड करते. प्रभूला एकेरी हाक मारते, हे बघून पारुला आश्चर्य वाटते. आंब्याच्या हंगामात पारु ज्योतीसाठी वाशिमला सरकारी दवाखान्यात घेऊन जायला सांगते. स्वत: पिकलेल्या आंब्याचे पाच फडे प्रभूजवळ पिशवीतून देते. अण्णाभाऊ साठे पुण्यतिथीच्या दिवशी गणा प्रभूला आडकाठी येतो. संतोषच्या हातातून त्याच्या मित्रांनी वर्गणीचा डबा हिसकावून घेतात त्याचा प्रभूच्या मनावर वाईट परिणाम. डॉक्टर, दवाखाने याचा त्याला गुण येत नव्हता. पारु संतोषला घेऊन वाशिमला असणाऱ्या नर्स ज्योतीला घेऊन येते व प्रभूची समजूत घालते. प्रभू त्यातून बाहेर पडतो. पारु संतोषला लोकगीत लिहून देते. संतोष तिला लोकगीत पुस्तकांत येईल असे सांगतो. आपले नाव पुस्तकात येणार म्हणून पारुला लाज वाटते. पारु प्रभूबरोबर मोर्चासाठी नागपूरला संघटनेच्या कार्यक्रमासाठी वाशिमला जात असते. संतोषच्या वर्गात अस्पृश्यता पाळली जाते. हे पारुला समजल्यानंतर ती चिंतेत पडते. पारुला संतोष

हा आंबेडकरांचाच अवतार वाटतो. संतोषसाठी आंबेडकर पारुला देव वाटतात म्हणून ती प्रभूला आंबेडकरांचा फोटो घरात आणायला लावते.

२) **बायजा :—**

बायजा प्रभूची आई आहे. अशिक्षित, अडाणी, एक आदर्श स्त्री व्यक्तिरेखा म्हणून मुसळेंनी तिचे व्यक्तिचित्रण केलेले आहे. कुलकर्णी मास्तर प्रभूला विचारतात तुझा जन्म किती साली झाला. त्याचे उत्तर तेच देतात १९४७ साली पण प्रभूही मायला बायजाला विचारतो त्यावेळी तिला निश्चित साल सांगता येत नाही. बायजा लहान असताना पाटील कुलकर्णींची मुले शिकत होती त्यांच्याचसाठी शाळा होत्या. महारामांगाच्या मुलांना शाळेत घेतले जात नसे. त्यांना शाळेत पाय ठेवायलाही जागा मिळत नव्हती. पडीचा हिस्सा, पड म्हणजे काय? प्रभूला बायजाच प्रथम सांगते. पड आणणे, जनावरे ओढणे, ती सोलणे, लग्नात वाजविणे, गावोगावी मर्तिकाचे निरोप देणे. इ. कामे मातंग समाजातील लोकांना करावी लागतात हेही बायजाच प्रभूला सांगते. बायजाला महार बौध्द झाले, त्यांनी गावकीची कामे सोडून दिली व त्या कामावर मातंग लोक टपून बसले होते. ती कामे मातंगांनी राजीखुशीने स्वीकारली ही माहिती येसाजी देतो. कुलकर्णी मास्तरांना बायजा प्रभूजवळ फडे तयार करुन देते. मास्तरांना पपई देते त्याचे आठ आणे प्रभूजवळ कुलकर्णी मास्तर देतात. तर ते पैसे बायजा प्रभूला परत कराय लावते.

बायजा इतर मातंग स्त्रियांप्रमाणेच मातंग समाजाचे पारंपरिक व्यवसाय करते. गावातील कुणब्यांच्या पाटलांच्या घरचे वाडयाचे सारवण, कुणब्यांच घरी दाळी, साळी, कांडणे, दळण पाखडणे, ज्वारी गहू यांचे दळण निवडणे, सडा टाकणे धुणे धुणे, यासारखी कामे करते. या मोबदल्यात भाकर मीठ, मिरच्या ज्वारी गहू, दाळ दाळींचा कणेर, मुगडया, वडया, पापड लोणचे कुरवडया जूने कपडे मिळायची, भगवान पाटलांच्या घरी सुंद्राई पाटलीण माडीच्या भिंतीचे सारवण करायला, पाणी भरायला, शेण आणायला पाटलीण बायजाला सांजते. मातंग स्त्रिया पाटलाच्या घरच्या । स्त्रियांना सासूजी म्हणत सुंद्राई पाटलीणीला बायजा सासूजी म्हणत होती.

सारवण करताना सुंद्राई पाटलीण बायजाला उंच भिंतीचं सारवण करायला सांगते. कारण शेणाचय पोतऱ्याची बादली शिडीवरुन घेऊन तोल सांभाळून सारवण करताना बादली खाली पडते. तेव्हा बायजाला पाटलीणीचा राग येतो. बायजा बरोबर तिची सून पारुही गावात मोलमजुरीला जाते. पारुच्या ओटीत नारळ टाकून तिची बोळवण करते. जुन्या रिती, प्रथा यांवर बायजाचा विश्वास असतो. प्रभूच्या लग्नानंतर बायजा लहान घराविषयी बोलते. कारण घरात प्रभूसहित सर्वांना दाटीवाटीने रहावे लागत होते. ग्रहणाच्यावेळी ती गावात ग्रहण मागते. प्रभूला गावकीची कामे करण्यासाठी सांगते पण त्याला पटत नाही. तो गावकीची कामे करीत नाही. कोतवाल पदासाठी पाटील प्रभूचे नाव सुचवितात यावर बायजा शेगांवच्या गजानन बाबाला नवस करते. पारुला मुलगा होतो. नाथाकडून समजल्यानंतर बायजाला आनंद होतो. नातवाच्या बारशाला जायची तयारी ती करते. बायजाला मात्र नातवाचे बारसे कोणत्या दिवशी आहे. याचा साधा हिशेब येत नाही आपला नातू कोणासारखा असेल? प्रभू? येसाजी? की पारु? असा तिला प्रश्न पडतो. नातवाचं तोंड कधी बघतयो इतकी तिला उत्सुकता लागते. कारण प्रभूनंतर बायजाच्या घरात पहिल्यांदाच पाळणा हालतो. प्रभू एकटाच असल्यामुळे ती प्रभूला जास्त जपायची, त्याला जास्त जीव लावायची.

येसाजी आणि प्रभू यांच्यामुळे बायजाला बाहेरच्या गोष्टींचे ज्ञान मिळते. नाथाशी बोलताना 'अमेरिका चंद्रावर गेली, अशी परिचयाची वाक्य तिच्या तोंडून येतात. अण्णाभाऊ पुण्यतिथीच्या दिवशी प्रभू मनातून उध्वस्त होतो. त्याचा बायजावरही परिणाम होतो. पारु वाशिमहून ज्योतीला घेऊन येऊन प्रभूची समजूत घालते. त्याचा बायजाला आनंद होतो. पारुच्या हुशारीचे कौतुक तिला वाटते. प्रभू—येसाजी यांच्या आणि वडगावातल्या मातंग समाजाशी निगडीत गोष्टीमध्ये ती सहभागी असणारी एक स्त्री व्यक्तिरेखा आहे.

**३) राजाराम मास्तर :—**

राजाराम लिंबा बेल्याचा भाऊ हा साधनाचा नवरा दीड दोन हजार लोकवस्ती असलेल्या गावात राजारांम आणि देवराव मास्तर एवढेच शिकून

नोकरीला लागलेले होते. राजाराम मास्तर नोकरीला असताना सगळया सरकारी नोकरांना नसबंदीची महिन्याला एक केस मिळवून दिल्याशिवाय पगार मिळत नव्हता. राजाराम नसबंदीची केस मिळवून देण्यासाठी यंकाला २०० रु. देतो. परंतु केस त्याला मिळत नाही. आणि पैसेही त्याचा राग राजारामची बायको साधना यंकाच्या बायकोला गवनाला मातंगाच्या पाण्याच्या विहीरीवर कपडे धुताना मारते. गवना अनसिंगच्या दवाखान्यात ॲडमिट असते. सरपंच लिंबा बेले, राजाराम हे दोघेजन यंकाला अधूनमधून धमकावतात. परंतु यंकाचा कैवार प्रभूशिवाय कोणीच घेत नाही. संभा बेल्याची मेलेला बैल ओढीत नाही. म्हणून यंकाला राजाराम मास्तर धमकी देतो. लिंबा बेले त्याची मुले, राजाराम यंकाला मारतात.

गवना अनसिंगच्या दवाखान्यात असताना लिंबा बेले व राजाराम गणाच्या मदतीने गवनाला औषध पाण्यासाठी पैसे पुरवितो. पण यंकाला सांगतो की पोलीसात केस करु नको. राजाराम उमऱ्याला मास्तर असताना गणाचा भाऊ बाजीराव त्याची बायको मीरा हिच्याशी अनैतिक संबंध ठेवतो. शाळेला जाता—येता, शेतात भांगलायला आलेल्या मीराला राजाराम भेटायचा मीराही त्याच्या सोबत रमायची. राजाराम रात्रीही मीराच्या घरी यायचा बाजीरावला पैसे दयायचा दुकानावर पाठवायचा आणि मीराबरोबर लगट करायचा गणाला हे राजारामचे वागणे पटत नव्हते. बाजीरावच्या घराला आग लागली असताना दरवाजातून अर्धवट कपडयात राजाराम आणि मीरा बाहेर पडतात. लोक दोघांना आगीत लोटून देण्याचा प्रयत्न करतात. राजाराम स्वत:च्या आब्रूसाठी रानात पळतो. अंधारात पडून त्याचा पाय मोडतो. आपला भाऊ लिंबा बेले सरपंच व्हावा. यासाठी आपल्या वार्डात राजाराम दारुच्या बाटल्या वाटतो. सरपंच निवडणूकीच्या गजू गणा, यांना राजाराम घेऊन येतो. पण लिंबा बेले सरपंच होत नाही. तेव्हा लिंबा बेले, राजाराम मास्तर गणा, गजूला बेशुध्द पडेपर्यंत मारता. अशाप्रकारे शिक्षक असून अनैतिक वर्तन करणारा भावाप्रमाणेच मग्रुरीने वागणारी एक 'वारुळ' मधील ही व्यक्तिरेखा आहे.

४) **संतोष :—**

संतोष हा प्रभूचा मुलगा. त्याचा जन्म १४ एप्रिल १९७० ला झालेला होता. मातंग समाजाची संतोष ही तिसरी पिढी आहे. ही पिढी शिकून सवरुन परिवर्तनवादी चळवळीचे नेतृत्व करायला मातंग समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी तयार होत आहे.

संतोष वडगावच्या मातंग समाजाला पहिला मॅट्रीक पर्यंत शिकणारा मुलगा होता. गावातल्या शाळेत न शिकता तो पाचवीपासून अनसिंगच्या हायस्कूलमध्ये शिकायला जातो. त्याच्या मते तिथे चांगले शिकवितात. सातवीत वर्गात त्याचा पहिला नंबर आला होता. त्यामुळे आठव्या वर्गात स्वत:हेडमास्तर त्याची काळजी घेतात. प्रभूला बोलावून त्याच्या हुशारी बद्दल सांगतात प्रभूही संतोषच्या शिक्षणाची काळजी घेतो. एस. टी. चा त्याला पास काढून देतो. घरात लाईटची सोय करतो. गावात आलेल्या तायडे मास्तरांना बँडवाल्याची खोली मिळाली असे प्रभूला सांगतो. गावात राहात असलेल्या तायडे मास्तरांच्या खोलीवर संतोष ९ वी ला असताना अभ्यासाला जायचा. प्रभू वडगावातील शाळेच्या गोरगरीब मुलांच्या कपडयासाठी जो वर्गणीचा डबा फिरवला तोच डबा संतोषच्या हातून गणा व त्याचे मित्र काढून घेतात. संतोष तसाच घरी येतो. अण्णाभाऊ साठे जयंतीला गणा प्रभूचा अपमान करतो. त्याचा परिणाम प्रभूच्या घराबरोबर संतोषवरही होतो. पारुबरोबर वाशिमला नर्स असणाऱ्या ज्योतीला आणायला संतोष जातो. ही नर्स असणारी ज्योती संतोषला प्रभूसारखेच शुध्द बोलायला शिकविते.

संतोष अभ्यासात हुशार होता. प्रभू अधूनमधून संतोषच्या अभ्यासाबद्दल शिक्षकाशी नेहमी चर्चा करायचा. संतोषला शिकवून मास्तर करायची प्रभूची इच्छा होती. व संतोषचीही मॅट्रीकच्या परीक्षेमुळे संतोषला इच्छा असूनही वाशिमला कार्यक्रमाला जाता येत नाही. संतोषच्या वर्गात अस्पृश्यता पाळली जाते. मात्र पाठक मास्तर संतोषशी चांगले वागतात. वर्गात सर्वात जास्त मार्क्स संतोषलाच मिळावीत अशी त्यांची इच्छा असते. डी. एड., बी. एड. चा शिक्षक कोणत्या वर्गांना शिकवितो हे संतोष घरात सांगतो. त्यावेळी घरात सर्वांना त्याचे कौतुक

वाटते. अशा प्रकारे संतोषची तिसरी पिढी आहे. ती मातंग समाजात शिकून सवरुन मातंग समाजाचे आणि परिवर्तनवादी चळवळीचे प्रतिनिधित्व करायला ती तयार होते.

५) **ज्योती :—**

ज्योती कुलकर्णी मास्तरांची भाची. कुलकर्णी मास्तरांना मुलबाळ नव्हते. म्हणून मास्तरांनी तिला आपल्याजवळ शिकायला आणले. प्रभूच्या वर्गात दोनच मुली होत्या त्यात ही ज्योती आणि पाटलांची राधा. चौथ्या वर्गापर्यंत ज्योती प्रभूच्या वर्गात होती. ब्राम्हण असूनही ती काळी सावळी होती. ज्योतीला पाहताच ब्राम्हणांच्या मुली काळया असतात? असा प्रभूसहित वर्गातल्याा मुलांना प्रश्न पडत होता. गणा ज्योतीला पाहून ती ब्राम्हणाची नसेल ठेवलेल्या बाईची असेल असे मित्रांना सांगायची. पाटलाच्या राधा पेक्षा ज्योती सावळी असली तरी प्रभूला ती आवडत असे. ज्योतीचं गालातल्या गालात हसणं, तिचे पाणीदार डोळे. हे प्रभूला आकर्षित करतात. बायजाने तयार करुन दिलेले फडे प्रभू कुलकर्णी मास्तरांना खोलीवर दयायला जातो. तेव्हा ज्योती प्रभूला घरात यायला सांगते. प्रभूच्या बोलण्यातील चुका कुलकर्णी मास्तरांसारखीच ज्योती दुरुस्त करते. प्रभू व मास्तरांना बशीतून फराळ देते. कुलकर्णी मास्तरांसारखीच ज्योती प्रभूचा बाट धरीत नाही. प्रभूची फराळाची बशी धुते. प्रभूला प्यायला पाणी देते.

वाशिमच्या दवाखान्यात नर्स म्हणून ज्योती काम करते. येसाजीला ॲडमिट केल्यानंतर त्याची सर्व काळजी जातीने घेते. प्रभू आणि पारुला जेवणाचा डबा आपल्या मुलाजवळ पाठवते. अकोल्याच्या दवाखान्यात ती पाच वर्षे असते तिची बदली वाशिमला होते. येसाजी बरा झाल्यानंतर ज्योतीला आनंद होतो. येसाजीसाठी रात्रपाळीचेही ती कामावर येत होती. येसाजीची सेवा करायला मिळाल्याने ज्योतीला धन्य वाटते. प्रभूला, येसाजीला काय हवे नको याची ज्योती विचार करते व त्यातून तिला आनंद मिळत असतो.

अण्णाभाऊ साठे पुण्यातिथीच्या कार्यक्रमापासून मनातून उध्वस्त झालेल्या प्रभूला समजूत घालून ज्योतीच ठिक करते. ज्योती—प्रभू यांच्यातील नाते

ज्ञानेश्वर--मुक्ताई प्रमाणे होते. मास्तरांकडे शिकायला ज्योती आली. त्यावेळी तिच्यापेक्षा दोन वर्षाने मोठा असणारा तिचा भाऊ मरण पावला होता. तेव्हापासून प्रभूला ती भाऊ मानते. परंतु प्रभू ज्योतीकडे वेगळयाच भावनेने बघत असतो. ज्योती प्रभूला भेटून गेल्यानंतर प्रभू पुन्हा वर्गणीचा डबा फिरवण्याच्या कामी लागतो. ज्योती प्रभूप्रमाणेच संतोषलाही शुध्द बोलायची सवय लावते, शिकवते. अशाप्रकारे थोडीशीच परंतु प्रभावी व्यक्तिरेखा म्हणून या व्यक्तिरेखेला महत्व आहे.

**६) सिदाजी पाटील :--**

वडगावच्या भगवान पाटलांचे आजोबा सिदाजी पाटील वय ८०--८५ वर्षाचे झाले तरी तब्बेतीने ठणठणीत होते. भगवान पाटलांचे वडिल देवबा पाटील १० वर्षे अगोदर दम्याच्या आजाराने मरण पावले याचे दु:ख पाटलांना फार झाले. आपल्या पोटी असा रोगी मुलगा जन्मला याचे त्यांना नवल वाटे.

८५ व्या वर्षीही सिदाजी पाटील पहाटे ५ वाजता उठतात. दोनशे जोर--बैठका मारतात. जवानीत ते ५०० बैठका मारायचे त्याचं खाणंही त्याच प्रकारचं होत बैठका मारल्यावर तोंड धुवून झाल्यानंतर घरच्या म्हैशीचं गुंडीभर दुध काढून गरम न करताच प्यायचे सिदाजी पाटलांना कुस्तीचा शौक होता. वाशिमच्या बालाजीची दसऱ्याला यात्रा भरते. त्या यात्रेतील कुस्तीत पाटील भाग घ्यायचे सतत दहा वर्षे पहिला इनाम मिळवतात. अकराव्या वर्षी मात्र बापू मडावी नावाच्या पैलवानाने पाटलांची पाठ टेकविली त्यावेळेपासून पाटलांनी कुस्त्या खेळणे सोडून दिले. परंतु अंगमेहनत व आहाराच्या मदतीने शरीर जसेच्या तसे ठेवले पोळयाच्या दुसऱ्या दिवशी मारुतीच्या पुढे असलेला सत्तर शेरांचा दगडी गोळा पाटील सहज उचलून पाठीमागे टाकत पाटलांच्या कुस्तीमुळे त्यांचे नाव दूरदूर प्रसिध्द झाले होते. वडगावला लोक सिध्दाजी पैलवानाचं वडगाव म्हणून ओळखत होते. वडगाव हे अडचणीत वसलेलं गाव होतं. वाशिमला, अनसिंगला कोर्टकचेरीच्या कामासाठी त्यांनी कधी बैलगाडी जुंपली नाही. ज्या दिवशी का असेल त्या दिवशी पहाटेच पाटील पायी निघायचे दिवस उगवायच्या आत अर्धा रस्ता त्यांनी पार केलेला

असायचा सेशन कोर्टाच्या केससाठी अकोल्याला सिदाजी पाटील ऐन पस्तीशीत ४० कोस अंतर पायीच तोडून जायचे. कोर्टाचे काम झाले की लगेच. तेवढेच अंतर तोडून परत यायचे त्यांच्या या चालण्याचे आश्चर्य सर्व लोकांना वाटत होते.

सिदाजी पाटलांनी कधी कोणाला विनाकारण त्रास दिला नाही. गावातली भांडणे गावात पाटील मिटवायचे, शेतीच्या खटल्याची केस फक्त अपवाद होती. विरुध्द पक्षाचा वासिमचा शंकरशेठ मारवाडी याने ही केस हायकोर्टापर्यंत नेली. पण सिदाजी पाटलांच्याच बाजूने केसचा निकाल लागला. वडगावात कोणाच्याही घरचा पाहुणा आला की तो पाटलांच्या घरी चहा प्यायला असायचा बौध्द धर्म स्वीकारायच्या आदी महारांची नेतेमंडळी पाटलांच्या बैठकीतच बसायची. पाटलांशी गप्पा मारायची, सल्ला विचारायची चहा—पाणी घ्यायची. वडगावच्या महार मंडळींनी बौध्द धर्म स्वीकारण्याबाबत पाटलांचा विरोध नव्हता. गावकीची कामे महारमंडळींनी सोडली तरी गावातील कोणीच त्यांना काही म्हणणार नव्हते. याची हमी पाटील घेतात. अशा प्रकारची हमी बौध्दांप्रमाणे मातंगांनाही देतात. पाटील मांगांवर गावकीच्या कामाची जबरदस्ती करीत नाही. जमलं तर करा. नाहीतर कोणा वाचून गावाची कामे राहात नाहीत. असा सल्ला मांगांना देतात.

बौध्दांनी कुणब्यांच्या विहिरीवर पाणीभरायला सुरुवात केली. रामाच्या—मारुतीच्या मंदिरात जायचं ठरविल्यानंतर सिदाजी पाटील बौध्दांच्या कर्त्या लोकांना बोलावतात. तेव्हा बौध्द लोक पाटलांना उध्दट उत्तर देतात. पाटलांना बौध्दांचा राग येतो. पाटील बौध्दांना स्वत: भेटायला जातात. बौध्दांना समजावून सांगतात. वातावरण गावातले बिघडवू नका गोडी गुलाबीने कोणत्याही गोष्टी करा. गाव नासवू नका. तरीही बौध्दांनी त्यांना विरोध करायला सुरुवात केली. पाटील बौध्दांच्या लोकांना कुणब्यांच्या विहिरीवर व मंदिरात पाय टाकू देत नाहीत. हातात उंच वेळूची काठी घेऊन पाटील गस्त घालतात. पाटलांनी बौध्दांवर बहिष्कार घातला. त्यांनी महारा—मागांना कधी हलकं लेखलं नाही. मागांच्या माणसांचं तोंड दिसावं म्हणून ते शेताकडे जाताना मागांच्या वस्तीतून जात मांग म्हणजे लक्ष्मीचा लेक त्यांना वाटे. मांगणीच्या हाताने दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी पुजा करायला लावली जाते. सूर्य चंद्राचे ग्रहण सोडवण्याची ताकद मांगामध्ये आहे असे पाटलांना

वाटते. मांगांच्या लोकांनाही सिदाजी पाटलांचं दर्शन झाले की बरे वाटते. मातंगाची पहिली पिढी पाटलांना 'खुरमान' (नमस्कार) घालते. मातंगांनी गावकीची कामे सुरु केल्यामुळे ढोरांच्या मटनाचा वास पाटलांना सहन होत नाही. त्यापायी आपलं येणं जाण बंद न व्हावं असे त्यांना वाटतं.

वडगावात हरिपाठ नित्यनियमाने चालत होता. त्यामध्ये मांगवाडयात यादव पखवाज वाजवित होता. आजारी असताना तो घरातच असतो. तेवढयात पाटलाचा गडी यादवला सांगतो की सिदाजी पाटलांचा मृत्यू झाला भर पावसात निरोप देण्यासाठी यादव निघतो. अशा प्रकारे एक गावगाडयातले महत्त्वाचे व्यक्तिमत्व इथे येते.

**७) शिदनाक :—**

हा महारांच्या पहिल्या पिढीतला आहे. आंबेडकरांनी दीक्षा घेण्याच्या अगोदर शिदनाक वडगावच्या सर्व महारांचा म्होरक्या होता. बौध्द धर्म स्वीकारण्यापूर्वी हाच शिदनाक ढोरे ओढणे, सोलणे हिस्से टाकणे, की कामे तोच करीत होता. आपल्यालाही पडीचा हिस्सा मिळावा म्हणून मातंग लोक बाजूला जमा होत. त्यावेळी शिदनाक त्यांच्या अंगावर ढोराच्या आतडयाचे चार तुकडे फेकत होता. खराब झालेले ढोरांचे मांस त्यांना देत होता. येसाजी पडीचा हिस्सा आणायला जाताना शिदनाक भेटतो. येसाजी शिदनाकाला विचारतो 'पडीचा हिस्सा आणायला येतोस का? शिदनाक बौध्द झाल्यामुळे प्रश्नात पडतो. पडीचा आशा लागून राहिलेल्या मातंगांना शिदनाक उपेक्षा करायचा म्हणून येसाजी त्याला असा लाजवितो. शिदनाक येसाजीला सांगतो. आंबेडकर बाबांच्या सांगण्यावरुन आम्ही गावकीची कामे करीत नाही. आंबेडकर बाबा गेल्या महिन्यातच वारले, येसाजी सांगतो. त्यावर शिदनाकाला राग येतो. येसाजीला शिदनाक सांगतो. 'आंबेडकर हे एकटया बौध्दांचेच नाहीत तर तुमचे आमचे सर्वांचेच आहेत. आंबडेकरांनी गावकीची हलकी सलकी कामे सोडा असे सांगितले. पण त्यात त्यांचा स्वतःचा थोडासाही स्वार्थ नव्हता. असे शिदनाक येसाजीला सांगतो हलकी सलकी कामातील लाचारी आंबेडकरांनी बौध्दांना दाखवून दिल्यामुळे माणसाला चांगले

दिवस कसे आले. अगोदरचे भोग कसे गेले. याबाबत शिदनाक येसाजीला म्हणजो. 'तुम्हीही पडीची कामे सोडावित त्याबदल्यात एखादी नोकरी, व्यवसायकरण्याचा सल्ला देतो आणि आमच्या आंबेडकरांसारखा एखादा नेता मातंग समाजाला भेटेल, तुम्हाला या गावकीच्या कामापासून परावृत्त करेल असा आशावाद शिदनाक येसाजीजवळ व्यक्त करतो.

बौध्द पूर्वी महार होते त्यावेळी त्यांच्या नावापुढे 'नाक' शब्द लावायची पध्दत होती. बौध्द झाल्यानंतर शिदनाकाला 'सिदाजी' म्हटले जात होते. हा बदल आंबेडकरांनी चालवलेल्या परिवर्तनवादी चळवळ आणि दिलेली दीक्षा याचा परिणाम होता. शिदनाक येसाजीला आवडत नाही कारण तो कधी कुणाशी सरळ वागला, बोलला नाही. बौध्द झाल्यानंतर शिदनाकाच वागणं बोलणं अधिक वाकडंच झालं. शिदनाक पाटलांच्या घरी मिटींग झाल्याचे विचारतो. त्याला येसाजीकडून नकारार्थी उत्तर भेटते त्यावर त्याचा विश्वास बसत नाही. पाटलांनी बौध्दांवर बहिष्कार टाकला तरी गावातले चार—दोन लोक शिदनाकाच्या विचाराचे असतात. तेच गावातल्या मिटींग संदर्भात त्याला सांगतात. शिदनाकाने महार असताना मांगांसारखे अपमानित जीवन जगले होते. त्याची आठवण येसाजीला करुन देतो. मातंगांनी बौध्दांबरोबर आंबेडकरांच्या विचाराने वागले असते तर त्यांना असे अपमानित जीवन जगायला लागले नसते. मातंगांना कुणब्यांना कधी विरोध केलेला पाहिले नाही. पाणी—पाडया महाराजाला मातंग वाचवितात याचे शिदनाकाला आश्चर्य वाटते. बौध्दांसारखा मातंगांचाही गावावर वचक निर्माण झाला. असे शिदनाकाला दिसते. मातंगांची एकजूट टिकावी असे त्यास वाटते. डॉ. भोपळे हे आंबेडकरांसारखे मातंगाचे नेते वाटतात. आंबेडकर हे सर्व जाती धर्माचे आहेत शिदनाक प्रभूला सांगतो. भोपळे साहेबांसारखे मोठे नेते यावेत असे शिदनाकाला वाटते. गणाच्या जागी प्रभू संघाचा अध्यक्ष झाला असता तर बरे झालं असते. सेव्हन पी. सी. आर कायदयाची ओळख प्रभूला करुन देतो.

शिदनाक बौध्द धर्माच्या कोणत्याही कार्यक्रमाला जातो. दसऱ्याला नागपूरला जातो. आंबेडकरांनी बौध्द धर्माची दीक्षा दिली त्यावेळी तोच सर्व वडगावातल्या बौध्दांचा पुढारी होता. गाववाल्यांनी टाकलेल्या बहिष्काराला तो जुमनित नाही.

औरगाबादला शिदनाकाचा नातू कॉलेजमध्ये शिकायला असतो. कारण आंबेडकरांनीच बौध्दांसाठी तिथं शिक्षणाची सोय केलेली आहे.

### ८) राजू खंदारे :—

कॉलेजमध्ये बी. ए. करीत असणारा राजू खंदारे याने वाशिमच्या अ. म. मातंग संघाच्या शाखेचे स्व. अण्णाभाऊ साठे वाचनालय सुरु केले होते. ते स्वत:च्या कोणत्याही मानधनाची आशा न करता चालवितो. खंदारे चालवित असलेल्या वाचनालयात अण्णाभाऊ साठे म. फुले, डॉ. आंबेडकरांची पुस्तके होती. या वाचनालयाला शासनाची कोणत्याही प्रकारची मदत मिळत नव्हती. वाचनालयाला शासनाची कोणत्याही प्रकारची मदत मिळत नव्हती. वाचनालयाचे होणाऱ्या प्रत्येकी १०रु. मासिक वर्गणी जमा करावी असे तालुका शाखेने सांगितले होते. ती वर्गणी वर्षाची एकूण ९ हजार रुपये जमा झाली. त्यामधील ५६ हजार पुस्तके घेतली जातात. उरलेल्या पैशात मातंगवाडयात एखादी बालवाडी सुरु करावी असे ठरले जाते.

खंदारे यांच्या या वाचनालयाला मोठा प्रतिसाद मिळत होता. नरेंद्र कांबळे या तायडे गुरुजींच्या मित्राच्या मदतीने राजू खंदारेकडून तायडे गुरुजी पुस्तके आणून वडगावातील मातंग वस्तीतील मुलांना देतात व फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे प्रबोधन करतात.

### ९) भोसले मास्तर :—

वडगावच्या शाळेत भोसले मास्तर कुलकर्णी मास्तरांनबरोबर होते. भोसले मास्तर जुन्या विचारांचे अतिशय कडक याउलट कुलकर्णी मास्तर शांत, हुशार संयमी होते. जुन्या विचारांचे असल्याने भोसले मास्तर मांगा—महारांच्या पोरांना शाळेत येऊ देत नाहीत. त्यांची नावे शाळेत घेत नाहीत. भोसले मास्तर जातीभेद पाळत होते. त्यांचा स्वभावही त्याच स्वरुपाचा होता. कुलकर्णी मास्तर 'माणूस कर्माने मोठा होतो जातीने नव्हे.' सांगायचे तर भोसले मास्तर जातीला कर्मापेक्षा महत्त्व दयायचे. शाळेत टोपी घालून न येणाऱ्या मुलांना दटावतात. कुलकर्णी

मास्तर त्यातले लक्ष देत नाहीत. कारण कुलकर्णी मास्तर सुधारित विचारांचे, सुधारणावादी विचारांचे होते. महार—मांग कितीतरी मुलांचे भोसले मास्तरनी नुकसान केलेले होते. त्यांची नावेच शाळेत ते घेत नसत. प्रभूचे नाव कुलकर्णी मास्तरांनीच पहिल्यांदा घेतले. भोसले मास्तर घेत नव्हते. भोसले मस्तर जुन्या विचारांचे, खेडयात रहाणारे होते. पहिल्या आणि तिसऱ्या वर्गाला ते शिकवत असत. तर कुलकर्णी मास्तर दुसऱ्या आणि चौथ्या वर्गाला मारतच. कुलकर्णी मास्तर चांगले शिकवत. प्रभूला त्यामुळे कुलकर्णी मास्तर आवडतात. घरातील सरपण संपले की प्रभूला भोसले मास्तर एक मोळी रविवारी सुट्टीत आणायला लावत. कुलकर्णी मास्तरांसारखे कधी प्रभूला घरात घेत नसत. कितीतरी वेळा प्रभूने भोसले मास्तरांना गोवऱ्या, लाकडाची मोळी बाहेरच्या बाहेर दिलेली होती. वडगावच्या शाळेत ते मुख्याध्यापक होते, तरी कट्टर जातीयवादी आहेत. खालच्या जातीच्या मुलांनी शिकूच नये असे त्यांना नेहमी वाटत असे. या भोसले मास्तरांच्या वागण्याचा राग कुलकर्णी मास्तरांना येतो.

पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या मृत्यूची बातमी वडगावात भोसले मास्तर सांगतात. उन्हाळयाच्या सुटटीत ते घरी जात नाहीत. कारण त्यांना घरी कोणीच नसते.

**१०) रामा बेले, लिंबा बेले :—**

१९६० नंतर खेडयापाडयात पंचायत राज आले. सरपंच गावात मानाचे मानले जाऊ लागले. सरपंचपद रामा बेलेले महत्वाचे वाटत नाही. नंतर मात्र मीच सरपंच होणार असे सर्व गावाला सांगतो. अगोदरच्या दोन इलेक्शनला रामा, राजाराम सरपंचाला विरोध करतो. वडगावच्या निवडणूकीत पहिल्यापासून उत्साहच नसतो. हळूहळू गावात संवेदशील मताचे लोक तयार होऊ लागले. ग्रामसेवकाप्रमाणे सरपंचालाही आर्थिक व्यवहारांचे अधिकार मिळाले. पाटीलांपेक्षा सरपंचाला महत्व आल्याने रामा बेले आपल्या मुलाला लिंबालाच सरपंच करीन असे गावात सांगतो. तर गावाचे पाटील राजारामलाच सरपंच कायम ठेवायचा विचार करतात. रामा बेले पाटीलांच्या विरोधात जातो. सावकार आणि पाटील

यांच्या जमिनीच्या व्यवहारात शिरकाव करतो. पाटिलांची जमीन स्वत:करायला लागतो. सरपंच निवडणूकीत लोकांची मने भडकाऊन देण्याचा प्रयत्न करतो. लोकांवर दबाव आणतो. बौध्दांना आपल्या बाजूने घेतो. भिकाला गावाच्या पाटलाच्या विरोधात आपल्याकडे वळवितो. पाटीलांना कोर्ट कचेरीचा त्रास सुरु करतो. मतासाठी दुष्काळात ज्वारी व पाण्याची सोय रामा बेले गावात करतो. लोकांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करतो. गावातल्या लोकांनाही रामा बेल्याचा लिंबा हाच सरपंच होईल असे वाटते. दुष्काळामुळे सरकार ग्रामपंचायतीच्या निवडणुका एका वर्षासाठी पुढे ढकलते त्याने रामा व लिंबा यांचे डोळे पांढरे होतात तरी पुढच्या वर्षासाठीही त्यांचे आव्हान कायम असते.

लिंबा बेले बौध्दांच्या वयस्कर मंडळीना भेटतो. सरपंचपदाच्या निवडणूकीत तुमची दोन मते मला मिळाली पाहिजेत असे सांगतो. तुम्ही म्हणाल ते मी ऐकतो पण त्याचे कोणीच काही ऐकत नाही. त्यावर बौध्दांना सिदाजी पाटलांनी टाकलेल्या बहिष्काराची आठवण लिंबा करुन देतो, पण त्याचा काहीच फायदा होत नाही. विनायक सरपंच होतो. विनायकने बौध्दांना दिलेला पुतळा पाहून लिंबा विनायक आणि बौध्द यांच्याविरुध्द गाववाल्यांना भडकवितो तर बौध्दांना त्याच ठिकाणी पुतळा उभारा असे सांगतो. त्याचे दुटप्पी धोरण असते. पुतळा प्रकरणात लिंबा, लिंबाला अटक होते. पाण्यावरुन साधना—गवनाला मारते तरी लिंबा राजाराम यंकालाच धमकी देतात. गवनाच्या औषधाला पैसे गणाजवळ देतात व पोलिसात रिपोर्ट देऊ नको सांगतात. मातंग समाजाची एकजूट करणाऱ्या तायडे मास्तरांच्या विरुध्द सभापतीजवळ लिंबा तक्रार करतो. भगवान पाटील रिटायर्ड झाल्यानंतर लिंबा बेले पाटीलकीसाठी टपून बसतो. पुतळा प्रकरणाची केस मागे घ्यायला लावतो. कारण सेव्हन पी. सी. आर च्या कायदयाने केसचा निकाल बौध्दांच्या बाजूने लागतो. केससाठी आपण एकच आहोत असे गाववाल्यांना सांगतो. यंका, संभा बेल्याचा मेलेला बैल ओढीत नाही म्हणून राजाराम मास्तर आणि लिंबा बेल्याची मुले यंकाला मारतात. लिंबा बेल्याला गणा प्रभूविरुध्द भडकवितो. हेच लिंबा बेले प्रभूला सांगतो. लिंबा बेले विनायकला सहजासहजी पाटील होऊ देत नाही. त्याने पुढल्या सरपंचाच्या निवडणूकीला स्वत:ला सरपंच व विकासच्या

भावाला उपसरपंचपद दयावे असा तोंडी करार विनायक कडे केलेला असतो. लिंबा बेले मातंगांना दुखावत नाही. कारण पुढे सरपंचकीसाठी मातंगांची त्याला मदत लागणार असते. ग्रामपंचायत निवडणूकीत मातंगांचा एक मेंबर निवडून येतो. त्याच्या मताची किंमत १५ हजार रुपये लिंबा बेले घेऊन प्रभूच्या घरी येतो. प्रभू ते पैसे नाकारतो. वर प्रभूला म्हणतो मलाच मत दयायला पाहिजे. मतासाठी सर्वात जास्त खर्च लिंबा आणि विकास करतो. लिंबासह त्याच्या पार्टीचे चौघे निवडून येतात. विकासचे फक्त दोनचं सदस्य निवडून येतात. त्यामुळे प्रभूवर लिंबा भरवसा ठेवतो. कारण लिंबाला फक्त एका मेंबरची अवश्यकता असते. ते मातंगाचे मत लिंबा मिळणारे असते. बौध्दांच्या दोन मेंबरपैकी एक त्याला सहज पटविता आला असता पण पुतळा प्रकरणात लिंबाला त्रास झालेला होता. लिंबा विकासला आव्हान देतो. गणा लिंबाकडून मातंगाच्या एका मताचे पैसे घेऊन जातो. प्रभू व गजूला त्याचे आश्चर्य वाटते. कारण पैसे प्रभू व मंजूने दोघींनी व घ्यायचा ठराव झालेला असतो. लिंबा धमकी देऊन प्रभूला सांगतो. की 'मत मलाच मिळांले पाहिजे, गावात लिंबाच सरपंच होईल अशी चर्चा सुरु असते. पण उलट होते. गजूने सरपंच पदासाठी विकासला तर उपसरपंच पदासाठी नामदेव बेलेला मत दिले म्हणून लिंबा बेले व त्याचे दोन भाऊ मिळून गणा, गजू यांना बेदम मारतात. प्रभू त्या दोघांना दवाखान्यात अनसिंगला घेऊन जातो. आणि लिंबा व त्याच्या भावा विरुध्द नावानिशी पहिल्यांदा पोलीसात रिपोर्ट देतो.

- **समारोप :—**

अशाप्रकारे 'वारुळ' कादंबरीत वरील व्यक्तिचित्रे आलेली आहेत. त्यात सर्वात महत्वाचे व्यक्तिचित्र येते ते 'प्रभू'चे प्रभूच्या जिवनकहानीशी निगडीत इतर व्यक्तिचित्रे येतात. 'प्रभू' हा या कादंबरीचा नायक गणाची व्यक्तिरेखाही तितकीच महत्वाची आहे. येथील प्रत्येक व्यक्तिचित्र प्रतिक आहे ते समाजात आढळणाऱ्या प्रत्येक वेगवेगळया प्रवृत्तीच्या माणसांचे म्हणूनच कादंबरीत या व्यक्तिचित्रणात लेखकाने समाजातील प्रत्येक घटकाचा विचार केलेला आढळतो यामध्ये मुख्यपात्रांचा समावेश अत्यंत महत्वाचा वाटतो. त्याबरोबर गौण पात्रेही तितकीच

महत्वाची वाटतात यापुढील प्रकरणात आपण कादंबरीचे सामाजिक दृष्टीने वाङ्. मयीन मूल्यमापन करणार आहोत.

- **निष्कर्ष :—**

१) 'वारुळ' मध्ये प्रभू ही मुख्यव्यक्तिरेखा आहे.

२) बाबाराव मुसळेंनी प्रभूची व्यक्तिरेखा अनेक वैशिष्टयपूर्ण प्रसंगातून, ओळी—ओळीतून जिवंत केलेली आहे.

३) प्रभू ही व्यक्तिरेखा मातंग समाजाच्या उत्कर्षासाठी झटणारी एक प्रभावी व्यक्तिरेखा आहे. सवर्णांकडून मातंगांना मिळणाऱ्या वागणूकीला धिक्कारणारी व्यक्तिरेखा आहे.

४) अभावग्रस्त समाजात ज्या विपरित परिस्थितीशी झुंजावे लागते. याचे प्रत्येय 'वारुळ' मधील व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून येते.

५) लहान मोठी बरीच पात्रे कादंबरीत कथानकाच्या गतिमानतेसाठी येतात.

६) स्वत:च्या हक्क मागण्यासाठी स्वत:च्या समाजाला एकत्र करुन परिवर्तनात स्वत:चा समाज यावा यासाठीच संघर्ष नायकाच्या भूमिकेत दिसतो.

७) 'वारुळ' कादंबरीत 'प्रभू' प्रमुख व्यक्तिरेखा ज्या प्रमाणात स्पष्ट होते त्या प्रमाणात इतर व्यक्तिरेखा थोडयाशा स्पष्ट होतात.

८) कथानकाच्या आवश्यकतेनुसार पात्रचित्रण 'वारुळ' कादंबरीत आहे.

९) प्रत्येक पात्राच्या तोंडची भाषा ही खास त्या त्या विशिष्ठ प्रदेशाची बोली भाषा आहे.

१०) कादंबरीतील सर्व पात्रे बोलताना विदर्भातील वैदर्भी बोलीचा आविष्कार घडतो त्यावरुन विदर्भातील व्यक्तिंच्या व्यक्तिविशेषांची ओळख होते.

- **संदर्भ ग्रंथ :—**

१) **संत जान्हवी** — 'कादंबरी : एक वाङ्मयप्रकार मोघे प्रकाशन, कोल्हापूर प्रथमावृत्ती नोव्हेंबर १९७१, पृ. क्र. ६१.

२) **मुसळे बाबाराव** — 'वारुळ' साकेंत प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती (२००४)